म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ५२५

RFFBK-0000595

पं० ५२९

सं. ..............

ता. ..............

वा० क्र ५९.९

ॐ

मराठामित्र पुस्तकमाला-पुष्प ४ थें.

# शूर स्त्रिया

( ऐतिहासिक कथानिकें. )

" जिचे हातीं पाळण्याची दोरी तीच देशातें उद्धरी. "

लेखक,

श्रीयुत-शंकर सुभानराव सकपाळ,

प्रकाशक,

श्रीयुत-गोपाळ दाजीबा दळवी, संपादक मराठामित्र

भायखळा-चमेलीची वाडी. पो. जेकब सर्कल, मुंबई.

REFBK-0000595

...र" मध्यें छापिलीं.

प्रथमावृत्ति

सन १९१०

किंमत ८ आणे.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

" गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः "

हिंदुस्थानाच्या तेजस्वी इतिहासांत अनेक नररत्नें, आपल्या आंगच्या लोकोत्तर गुणांनीं, आपलीं नांवें अजरामर करून गेलीं आहेत. तद्वतच कैक स्त्रीरत्नांनीं आपल्या आंगच्या अद्वितीय गुणांनीं, इतिहास भूषविलें आहे. शौर्य, वीर्य, धाडस आणि पराक्रम इत्याद्यनेक गुणसमुच्चय पुरुषांच्या ठायीं वास करतात, आणि " स्त्रियांचें शहाणपण कायतें चुलीपुरतें " असें म्हणणारांनीं, आपल्या इतिहासाकडे सूक्ष्म नजर द्यावी.

स्त्रीजातीच्या नैसर्गिक भीरुपणास झुगारून देऊन, ज्या स्त्रियांनीं आपल्या कोमल हस्तांत नंगी समशेर धरून ती पुरुषाप्रमाणेंच चमकवून दाखविली आहे, आणि कैक प्रसंगीं तर पुरुषावरही ताण केली आहे अशीं स्त्रीरत्नें इतिहासांत बरींच आहेत. तीं सूक्ष्मावलोकनानें धुंडाळून काढावी आणि स्त्रियांच्या आंगच्या कर्तबगारी, असामान्य धैर्य, विलक्षण साहस, अचाट पराक्रम व वीरोचित रणधुरंधरपणा, लोकांच्या व विशेषतः आमच्या भगिनीवर्गाच्या-सामर्थ्यवान्, सुशिक्षित व स्वाभिमानी प्रजा उत्पन्न होण्यास मूळ कारणीभूत अशा ज्या माता-त्यांच्या नजरेसमोर मैनलदेवीसारख्या मातांचीं चरित्रें आणून अखिल भारतवासीयांचें लक्ष इतिहासाकडे लागावें अशा दुहेरी उद्देशानें, आह्मीं हें प्रस्तुत

पुस्तक आमचे मित्र श्रीयुत, शंकर सुभानराव सकपाळ यांजकडून उपलब्ध असलेल्या माहितीवरून लिहवून घेतलें आहे. चरित्रें कशीं काय वठली आहेत हें पाहणें वाचकांचें काम आहे. हा प्रयत्न फलद्रुप झाल्यास पुनः दुसऱ्या कांहीं अप्रसिद्ध आर्य स्त्रियांचीं चरित्रें प्रसिद्ध करण्याची आमची इच्छा आहे. ईश्वर करो! व ती आमची इच्छा—आमच्या आश्रयदात्यांस वाचनाची गोडी लागून फलद्रुप होओ!

शेवटीं ज्या सद्‌गृहस्थांनीं व भगिनींनीं ह्या पुस्तकास आगाऊ नांवें नोंदवून पुस्तक प्रसिद्ध करण्यास उत्तेजन दिलें, त्यांचे आभार मानून, हे दोन शब्द पुरे करितो.

आपला सर्वांचा कृपाभिलाषी,

गो. दा. दळवी.

प्रकाशक.

# शूर स्त्रिया.

## दाहिरकन्या.

(१)

मधुर फळांवर पक्षी–वृंदाची जशी धाड पडून त्यांचा फन्ना उडतो, तद्वतच आर्यावर्तरूप मधुर फळावर मोंगल, आरब, पठाण, बलुची, इत्यादि मानवरूप खादाड क्रूरकर्मी पक्षांनीं–धर्मवेडामुळें, द्वेषभावामुळें, तिरस्कारानें, शूरत्वानें, अदयतेनें व अज्ञानानें, या सुसंपन्न, सुवर्ण देशाचे–हिंदुस्थानाचे–तुकडे तुकडे उडविले होते !

वरील क्रूर जातींच्या सहवासानें आर्यावर्तांतील शांततेचा भंग होऊन, त्यांच्या क्रूरपणाची छटा येथल्या शांतगंभीरवृत्तीच्या लोकांच्या अंगाला लागून ते लोक, विलक्षण क्रूरकर्मी बनले ! त्यांच्या शांततेचा भंग होतांच ऐक्याभाव, दुर्दमनीयकलह, अनाचार, सुविचारशक्तीचा लोप इत्यादि कारणांमुळें हा देश हळूहळू अवनतीप्रत पोहोंचला !

"स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" या वचनाप्रमाणें क्षत्रियांनीं,–धर्मक्रांतीच्या व स्वधर्मप्रसाराच्या उद्देशानें आलेल्या ह्या क्रूर जातींशीं–वर्तन ठेवण्यास कमी केलें नाहीं. आमच्या पुरातन परमपूज्य धर्मांतील उदात्त आचरणादि नियमांप्रमाणें ते वागले यांत संशय नाहीं. पण ह्या विश्वासघातकी, स्वार्थप्रिय, मंदमति यवनजातीशीं कांहीं प्रसंगीं ते विश्वासानें व भोळेपणानें वागल्यामुळें त्यांचा मोठा नाश झाला आहे; किंबहुना ते सर्वस्वाला आंचवले, असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं; धर्म-भोळेपणा आम्हांला किती नडतो यांचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ सांपडतील !

वर सांगितलेल्या धर्मवेड्या लोकांनीं नरमेधादि अनन्वित कृत्यांनीं एके-काळीं हा शांत–गंभीरवृत्ति असलेला देश यमपुरीसदृश भासवून दिला !

स्वधर्म—स्वहक्क स्थापनेच्या प्रबलतर इच्छेनें हिंदुस्थानांत आगंतुक शिर-लेल्या या लोकांनीं दंगे, जुलूम व लूट चालविली होती. ते लोक जात्याच क्रूर, निर्दय, पिसाळ, व परदेशस्थ असल्यामुळें त्यांनीं आपल्या चालीरीतींचा या देशांत प्रसार करण्यासाठीं येथील पवित्र धर्मांचा, धर्म-बांधवांचा व धर्मभगिनींचा अमानुष व अनिर्वाच्य छल केला; अपरिमित धन लुटून नेलें, लक्षावधि सुसमृद्ध देवालयांचा विध्वंस केला, व अग-णित मनुष्यांचे खून केले, देशाचे सुसमृद्ध भाग भिकारी व रुक्ष केले. यवनांच्या दुष्कृतीनें सुपीक देश, मरुभूमि सदृश झाले ! सस्यपूर्ण क्षेत्रें कंटकसमाकीर्ण होऊन क्रूर श्वापदांचीं क्रीडास्थानें बनलीं ! मनोरम उद्या-नांतील सुकुमार तरुवल्लरीही या क्रूरकर्म्यांच्या कुगंधानें निस्तेज व शून्य झाल्या, धर्मलताही शुष्क होऊन त्यांना सुकृताचीं मधुर फळें येईनातशीं झालीं. इतका तो काल भयंकर होता !

यवनांच्या आक्रमणामुळें व धर्मवेडामुळें या देशांतील स्वाभाविक स्वतंत्रेला मोठा धक्का बसला. यवनांचें बहुतेक लक्ष, हिंदुस्थानांतील संपत्तीकडे व सुंदर स्त्रियांचा अपहार करण्याकडे लागलेलें होतें. व याच कारणामुळें ते जुलमी झाले होते; अशा कठिण प्रसंगीं, त्यांच्या जुलमाचें बंधन तोडण्याकरितां, आपली पुराणकीर्ति अढळ राखण्याकरितां, नर-नारी रत्नांना त्याकाळीं परलोकच्या पवित्रतम मार्गाचें अवलंबन करावें लागत होतें ! रसिकवाचक ! 'दाहिरकन्या' हाहि प्रसंग त्याचपैकीं आहे. तो तुमचें मन दयार्द्र करील.

इ. स. ६३२ त यवनधर्मसंस्थापक महंमद पैगंबर हा मरण पावला. महंमदाच्या वेळीं फक्त अरबस्तानांतच मुसलमान धर्माचा प्रसार झाला. महंमद मरण पावल्यावर धर्मप्रसाराचें काम ज्यांच्याकडे होतें त्यांस "खलिफा" म्हणत. या खलिफांत पहिले तीन अबूबकर, उमर, उस्मान, हे अधिकारी असतांना त्यांनीं महंमदाची आज्ञा यथार्थ पाळिली. पण चौथा खलिफा जो "अली" नामें झाला, त्याच्यावेळीं सगळी अव्यवस्था झाली आणि तंटे उत्पन्न होऊन "शिया" व "सुनी" असे दोन पंथ निर्माण झाले. परंतु पुढेंहि ह्या धर्माचा प्रसार होतच होता.

इराण ( वनायुदेश ) तुर्कस्थान, आफगाणिस्थान, मध्यएशिया, व उत्तर आफ्रिका येथील लोकही या धर्माचे अनुयायी बनले होते. यूरोपचें

नैऋत्य टोंक जेबलतारिक–जिब्राल्टर येथपर्यंतही महमदी धर्माची पताका फडकत होती. परंतु, पंधराव्या शतकांत स्पेन, ग्रीस, मासिडोनिया, सीरिया, आशियामैनर, मिसरी देश, उत्तर आफ्रिका, ब्रिटन, फ्रान्स जर्मनी, टर्की इत्यादि देशांवर अंमल गाजविणाऱ्या शूर रोमन लोकांची–साम्राज्यमदानें धुंद होऊन ऐषआरामरूपी सुसरीनें दृढतर विळखा घातल्यानें–जी स्थिति झाली, तीच स्थिति अकराव्या शतकांतील मुसलमान साम्राज्याची झाली. फरक एवढाच कीं ही स्थिति थोडी मागची आहे व उपरिनिर्दिष्ट केलेल्या रोम साम्राज्याची स्थिति पुढची आहे. येणेप्रमाणें महंमदी धर्माच्या पश्चिमदिशेकडील वर्चस्वाला ओहोट लागून नंतर ही धर्मरूप सागराची प्रचंडोर्मि पूर्वेकडे वळली. असो;

ऐतिहासिक कथानकांबरोबर थोडीशी ऐतिहासिक माहितीही वाचकांना द्यावी अशी माझी इच्छा असल्यामुळें, ती मी वर दिलीच आहे. आतां कथानकाकडे वळूं.

आरब लोकांनीं ज्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर केल्या त्या द्रव्य प्राप्तीस्तव किंवा देश काबीज करण्याकरितां फारशा केल्या नाहींत तर हिंदुस्थानांतील स्त्रिया फारच सुंदर असतात; त्या खलिफ साहेबांना नजर करून त्यांच्याकडून शाबासकी मिळवावी एवढ्याचकरितां होत्या.

पहिली स्वारी इ. स. ६६४त महबल नामक सरदारानें केली. तो मोठा शूर योद्धा होता. सिंध प्रांतात अंमल बसविण्यासाठीं त्यानें एक गलबत देवल बंदरीं धाडिलें होतें. त्याला देवल येथील लोकांनीं अडकाऊन ठेविलें होतें, तें मुक्त करावें म्हणून सिंध व मुलतान येथील क्षत्रिय राजा दाहिर याला विनंति केली, पण त्यानें तिजकडे दुर्लक्ष केलें. यामुळें आरबांस राग येऊन त्यानीं एकहजार पायदळ व तीनशें स्वार इतकें सैन्य दाहिर राजाच्या पारिपत्यास पाठविलें. परंतु दाहिर राजा प्रबल असल्यामुळें त्यानें अरबांचा अगदीं नाश केला. हें वर्तमान इ. स. ७११त बसरा येथील सुमेदार हिजाज यानें ऐकतांच आपला पुतण्या महंमद कासिम याच्याबरोबर ६००० सैन्य देऊन दाहिरावर पाठविलें, यावेळीं खलिफा 'वालिद' हा होता.

दाहिर राजाचा सूड घेण्याचा दृढनिश्चय करून, जय्यत तयारीनें आलेल्या महंमद कासिमानें प्रथम देवल शहराला चोहोंकडून वेढा दिला.

व त्या शहराजवळील एका बळकट देवळावर त्यानें आपला हल्ला चढविला, पण तें ताबडतोब हस्तगत झालें नाहीं. कारण शूर रजपुतांचें सैन्य त्यांत होतें. त्यानें कासमचा हल्ला परत फिरविला. परंतु एका फितुरी मनुष्यानें त्याला "देवळावरचें निशाण" पाडल्यास या लोकांचा पराजय होईल, असें सांगितल्यावरून कासिमच्या सैन्यानें तें निशाण पाडिलें. तें पाहून आंतील लोक घाबरून गेले, कांहीं लढून मेले; व कांहीं पळून गेले. हें पाहून ते क्रूर लोक आंत शिरले. त्यांनीं त्या देवालयांत जे लोक सांपडले त्यांची तत्क्षणींच सुंता करून टाकिली! स्त्रिया व सत्रा वर्षांहून कमी वयाचीं मुलें यांखेरीज सर्वांची एकदम कत्तल उडविली. या विजयानें ते लोक धुंद होऊन अखेरीस त्यांची मोठी धाड सिंधची राजधानी अलोरनगर याजवर आली.

देवलनगरांत हिंदूंचा झालेला अपमान पाहून शूर दाहिराला अत्यंत क्रोध आला; दाहिरराजा अस्सल क्षत्रिय, व धर्माभिमानी होता. त्याला मुलेंबाळें बरींच होतीं. त्यांत दोन कन्या फारच रूपसंपन्न होत्या. त्या जशा लावण्यानें संपन्न होत्या, तशाच सद्गुणांनींही भूषित होत्या. यवनांनीं मातृभूमीची चालविलेली विटंबना त्यांना मुळींच सहन होत नव्हती. त्या शूर क्षत्रियवाला युद्धकलाविशारद असल्यामुळें, यवनांस एकदां तरी आपलें रणकौशल्य दाखवावें असें त्यांच्या मनांत फार होतें; कशा झाल्या तरी त्या शूर क्षात्रकन्या होत्या. दोन्हीही कुमारीच होत्या. युद्धाचा प्रसंग आल्यास रणभूमिवर जाण्यास पित्याची आज्ञा घ्यायचिच असा त्या अभिमानी बालांनीं दृढनिश्चय केला होता.

अखेर येणारी वेळ आलीच. आपल्या राजधानीवर हल्ला येणार हें पाहून काय व्हावयाचें असेल तें होवो, असा निर्धार करून राजानेंहि युद्धाची तयारी केली! पन्नास हजार सैन्य जमा केलें, व त्याचें आधिपत्य स्वतः पत्करलें. लढाईची ही तयारी पाहतांच त्या बालिकांना अतुल धैर्य प्राप्त झालें; उत्साहानें त्यांचीं सुंदर मुखें तेजयुक्त झालीं; मातेची आज्ञा घेऊन त्या दोघीजणी पित्याकडे गेल्या. व म्हणाल्याः—"पिताजी! आम्हांलाही आपल्या बरोबर न्या; दुष्ट यवनांना क्षात्रबालांमध्यें कसं काय रणकौशल्य वसत असतें तें एकदां तरी दिसूं द्या" परंतु दाहिरराजाला तशी आज्ञा देणें बरें वाटेना; तो त्यांची समजूत करून म्हणाला,

"मुलींनो ! माझ्या बाहूंत यवनांचं निर्दलन करण्याचं सामर्थ्य असतां मी तुम्हांला रणांत कशाला नेऊं ? यदाकदाचित् विपरीत प्रसंग ओढवल्यास तुम्हीं क्षात्रधर्मोचित कृति करण्याला मात्र विसरूं नका; तुम्ही आपल्या मातेचं योग्य रक्षण करा; इतक्यांत मी विजय मिळवून येतोंच."

पित्याची आज्ञा त्यांना अखेरीस मोडविली नाहीं, पण उत्साह भंगामुळें त्यांच्या कोमल मनास थोडीशी अस्वस्थता प्राप्त झाली.

इकडे रणभूमीवरील दोहों पक्षांचीं सैन्यें तयारीनें उभीं राहिलीं. राजानें प्रथम चाल करून जाऊन कासिमावर हल्ला केला. तेव्हां मोठी गर्दी उडून घोर रणधुमाळी माजली, रजपूत व यवन यांच्यामध्यें एक तासभर कडाक्याचें युद्ध होऊन दाहिरराजावर तेवढ्यांतच एक भयंकर संकट ओढवलें. शत्रूच्या सैन्यांतून एक बाण येऊन राजाला लागला. त्यामुळें सैन्यांत मोठी गडबड उडाली. इतक्यांत ही खबर राणीला लागतांच ती कांहीं सैन्य घेऊन राजाच्या मदतीस आली. ती येत असतां मार्गांत तिला अडथळा करण्याचा कासिमानें प्रयत्न केला पण आमच्या चरित्रनायिका दाहिरकन्यांनीं कासिमाचें कांहींएक चालूं दिलें नाहीं. इतकेंच नाहीं तर खुद्द त्यालाहि जखमी केलें. राणीला अडविण्याचा हा प्रयत्न झाला व इकडे राजावर आणखी एक निराळेंच संकट ओढवलें. राजाच्या हत्तीस तोफेचा गोळा लागला; तेव्हां तो तळमळत निघाला तो नदींत जाऊन थांबला; आणि शरिराचा दाह शमविण्याकरितां त्यानें तींत बुडी मारिली ! इतक्यांत राणी आपल्या साह्यास आल्याचें वर्तमान राजास कळून त्याला दुप्पट धैर्य चढलें. राजाचा हत्ती पाण्यांत बसतांच राजाला ठार करावें या हेतूनें यवन लोक त्याच्यावर बाणांचा मारा करूं लागले. पण दाहिरकन्यांनीं अनुपम शौर्य दाखवून बराच वेळ त्यांची पिच्छेहाट करविली. इतक्यांत राजा तीरावर सुरक्षित पोहोंचला; व घोड्यावर स्वार झाला.

पुनः समराग्निची ज्वाला प्रज्वलित झाली. व तिनें भयंकर अनर्थ मांडिला. "दीन् दीन्" व "हरहर महादेव" ची आकाशभेदी गर्जना ऐकूं येऊं लागली. कांहीं वेळानें युद्धाच्या ऐन रंगांत कासिम व दाहिर समोरासमोर येऊन लढूं लागले. कासिमचे जे लोक ताजेतवाने होते ते

आतां पुढें "दीन् दीन्" करीत तलवारी चमकवीत आले. राजाचें सैन्य अगोदरच कचरलें होतें, तें या नवीन टोळीला पाहून विशेषच धैर्यहीन झालें. तरी राणी व तिच्या दोन कन्या आमच्या चरित्रनायिका आपल्या शौर्याची शिकस्त करून लढत होत्या व स्वतः सैन्यास धीर देऊन लढण्यास उत्तेजित करीत होत्या; तरी सगळ्या लष्करांत पहिला उत्साह मुळींच राहिला नव्हता. इकडे कासीमची व राजाची खूप झुंपली होती. तींत कासीमच्या डाव्या हाताला वार लागून तो मागें सरला. व नवीन टोळीचा सरदार युनाखा हा पुढें होऊन त्यानें राजास जखमी करून त्याला घोड्यावरून खालीं खेंचिलें. इतक्यांत राजाच्या वडील मुलीनें यूनाखाचें मस्तक रणभूला अर्पण केलें! व शोकविव्हल स्वरानें पित्याच्या कंठाला मिठी मारून ती म्हणाली. "पिताजी! आपल्या कन्येकडे एकवार तरी पहा. पिताजी, आपल्याला कसं वाटतं? अरे, कोणी तरी थोडं पाणी आणा रे! कुणी यांचं जरा रक्षण कराहो, अरे, तुम्हीं यांचं अन्न खाऊन बेमान कसे झालां?" परंतु हाय!

राजाचे नेत्र मिटले ते पुन: उघडले नाहींत. राणीवर भयंकर प्रसंग ओढवला! तीही लगबगीनें तेथें धांवत आली, व राजाच्या मुखाचें चुंबन घेऊन म्हणाली नाथ! आपण मला कसें हो टाकून निघून गेलांत?

त्या साहसी राणीनें एकदम राजाचें प्रेत उचलून घोड्यावर ठेविलें व चटकन् स्वार होऊन तिनें 'ब्राह्मणाबाद' येथें—जेथें राजाचें पराभूत झालेलें अर्धें मुर्धें सैन्य जमा झालें होतें—तेथें ती आली. राजाचीं दुसरीं एक दोन लहान मुलेंही तेथेंच होतीं. नंतर राजाचा देह हृदयाशीं कवटाळून त्या मुलांसह तिनें आपला देह अग्न्यार्पण केला! अशा रीतीनें आपल्या पतिप्रेमाची तिनें सीमा करून दाखविली!

परंतु! रसिक वाचक! चरित्रनायिकांचा वृत्तांत अझून तुम्हांला विदित करावयाचा आहेच.

राजा पडतांच दाहिरकन्यांच्या सुस्वरूपाला भाळलेल्या मुसलमानांनीं गर्दी करून त्यांस कैद केलें, व दमास्कस येथील खलिफा वालिद याजकडे नेलें. त्या खुबसुरत चेहऱ्यांकडे पाहून खलिफासाहेब अगदीं दंग होऊन

गेले, ते इतके कीं, त्या नादांत त्यांनीं असा हुकूम फर्मोविला. कीं, " राजाच्या मुली जें सांगतील तें सर्व खरें मानिलें जाईल. "

हा हुकूम ऐकतांच दाहिरकन्यांस फारच हर्ष झाला. व त्यांनीं कासीमचा सूड उगविण्याचा एक मार्ग शोधून काढिला. एके प्रसंगीं खलिफा साहेब, त्यांच्या खुबसुरत चेहेऱ्याचें दर्शन घेण्यास म्हणून गेले असतां दाहिरराजाची वडील कन्या म्हणाली, " खलिफासाहेब, कासिमची आमच्यावर फार पापी नजर आहे. आपली इच्छा नाहींशी करण्याचा त्याच प्रयत्न आहे. "

हें वाक्य ऐकतांच वालिदास मोठा राग आला; तो इतका कीं, "कासिमाला कातडयाच्या भोतांत एकदम शिवून मजसमोर आणा" असा त्यानें हुकूम केला. त्याप्रमाणें त्याला आणल्यावर दाहिरकन्या म्हणाली:—आतां आमचें समाधान झालें; जो अपराध त्यानें केला असें मीं सांगितलें, तो त्यानें केला नाहीं; परंतु ह्या राक्षसाच्या कृत्यानें माझी आई व भांवडें अग्निमुखीं पडलीं; त्याचा हा मीं सूड उगविला ! "खलिफा साहेब, आतां आम्हींही जातों." असें म्हणून त्या दोघीहि शूर क्षात्रबालांनीं आपले पवित्र प्राण शस्त्रप्रहारानें पवित्र करून पवित्रतम स्वर्गलोकीं त्या निघून गेल्या !

मा.
ग्रं.

# वीरकन्या–ताजकुंवर.

( २ )

कथानकाचा काल इसवी सन १०१७ चा. ह्यावेळीं गज्नी घराण्यांतील बादशहा सुलतान महमूद हा द्रव्यलोभानें वेडा होऊन, हिंदुस्थानच्या निरनिराळ्या संपन्न भागांवर स्वाऱ्या करून, लुटालूट करीत होता.

या बादशहानें हिंदुस्थानावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या असें इतिहासांत लिहिलें आहे. या महत्वाकांक्षी सुलतानास इतकें नक्की माहीत होतें कीं, हिंदुस्थानांतील राजांत अंतःकलह फार आहेत, तेव्हां आपणांस वित्तलाभ व साधल्यास राज्यवृद्धि होऊन लौकिकताही संपादन करितां येईल.

सुलतान महमूद जरी द्रव्यलोभी होता, तरी त्याच्या आंगीं चातुर्य, पराक्रम, दीर्घउद्योगाची हांव, साहस हे गुण फार उत्कृष्ट रीतीनें वास करीत होते. अपरिमित द्रव्यसंचयाचा त्यानें दुरुपयोग कधींच केला नाहीं. हिंदुस्थानांतून कित्येक कुशल कारागीर गज्नीस नेऊन त्यानें शिल्पकलेस उत्तेजन दिलें व संगमरवरी पाषाणांच्या रत्नांकित सुंदर इमारतींनीं सगळें गज्नी शहर सुशोभित करून सोडिलें ! पण हें सगळें हिंदुस्थानच्या संपत्तीवर केलें ! असो.

हा बादशहा विद्वानांचा चाहता होता. विद्वानांच्या चरितार्थ त्यानें एक लक्ष रुपये वेगळे काढून ठेविले होते, असें एके ठिकाणीं लिहिलेलें आढळतें. तसेंच धर्मप्रसारासाठीं त्यानें कोणावर जुलूम केला नाहीं, किंवा दुष्ट करही बसविले नाहींत. त्यांजकडून जितकें द्रव्य निघेल तितकें काढवून, त्यांस धरून आपल्या देशास न्यावें हाच त्याचा हेतु असे. त्यानें गज्नीस इतके हिंदुलोक धरून नेले होते कीं, दर मनुष्यास दोन अडीच रुपये देऊनही 'गुलाम' म्हणून कोणी विकत घेत नव्हतें !

आमच्या कथानकाचा आणि इसवी सन १०१७चा मोठा संबंध आहे. कारण १०१७ त महंमुदाची नववी स्वारी कनोजवर झाली. ह्याचवेळीं

आमच्या कथानकांतील वृत्तांत घडून आला. ह्या स्वारींत सुलतान म. मुदानें बरींच लांबवर सफर मारिली होती. खुद्द सगळा अयोध्याप्रांतही तो आपल्या ताब्यांत आणण्याचा यत्न करीत होता. पण तो यत्न अखेरीस निष्फळ झाला. महंमुदानंतर त्याचा भाचा सय्यद सालर मसाऊद गाझी यानेंही अयोध्या प्रांतावर स्वारी केली होती, पण त्यावेळीं अयोध्येच्या सर्व संस्थानिकांनीं एकमत होऊन अखेरीस त्यालाही तीव्र बाणानें गतप्राण केलें, ( इ. स. १०३३ ).

परंतु ज्यावेळीं महमुदानें कनोजवर चाल केली त्यावेळीं तेथलि क्षत्रिय राजा कुवरराय हा महंमुदाशीं लढण्यास आपलें बळ नाहीं हें पाहून त्याला शरण गेला व त्यानें आपलें संरक्षण केलें. ह्याच कुवररायाचा कोणीएक आप्तसंबंधी सज्जनसिंग नांवाचा गंगेच्या कांठीं असलेल्या कानपुराजवळील किसोरा नामक लहानशा संस्थानाचा अधिपती होता. याच सज्जनसिंहाची कन्या ताजकुंवर ही होय. सज्जनसिंह हा ठाकूर जातीचा क्षत्रिय होता. कांहीं दिवस तो कानपुरच्या राजाचा मांडलिक होता. पण यवनांनीं अयोध्येवर हल्ले केले, तेव्हां इतर संस्थानिक त्यांचा प्रतिकार करण्यास गुंतले होते, ही संधि पाहून किसोरा संस्थान आपणांस स्वतंत्र ह्मणवूं लागलें. किसोरा स्वतंत्र झालें तें केवळ नांवाकरितां स्वतंत्र झालें नाहीं, तर सज्जन-सिंगाच्या शूरत्वानें व मानीपणानें तें स्वतंत्र झालें होतें. सज्जनसिंहास दोन मुलें होतीं. एक मुलगा व एक मुलगी. मुलाचें नांव लक्ष्मणसिंह व मुलीचें नांव ताजकुंवर. ताजकुंवर सौंदर्याची तर मूर्तिमंत पुतळीच होती. तिच्या सौंदर्यावर नीच कुतुबुद्दीनाचें अंतःकरण जडलें होतें. व ती मिळावी एतदर्थ त्याचे प्रयत्न चालू होते. त्याला इतकें पक्कें माहीत होतें कीं, सज्जनसिंहाकडे आपण जबरीची मागणी केली तर तो आपली कन्या देणार तर नाहींच, पण उलट आपल्या लहानशा सत्तेचा मात्र तो नाश करील. हें जाणून पापी कुतुब हळूहळू आपली सत्ता वाढवून दृढ करण्याचा प्रयत्न करीत होता.

वर निर्दिष्ट केलेल्या सुलतान महंमुदाच्या स्वारीनंतरही कित्येक वर्षे, पुण्यसलिला गंगेच्या प्रवाहानें जलपूर्ण व सुसमृद्धित असलेल्या; विविध-वृक्षांच्या अनेकविध रायांनीं वेष्टिलेल्या; विहंगांच्या मधुर कलरवानें निना-दित असलेल्या; सुन्दर लतांनीं, मनोहर उद्यानांनीं, पुष्पांच्या संसर्गानें

सुगंधित झालेल्या; सृष्टिसौंदर्याच्या आदिस्थानास ( अयोध्याप्रांतास ) भुलून आधींच आरामप्रिय असलेल्या यवनांनीं तो आपल्या ताब्यांत आणण्याचा यत्न चालविला होता असें स्पष्ट दिसतें. महंमूदानें या सृष्टि-सौंदर्याचा सुखास्वाद घेण्याकरितां एकंदर चार वर्षें त्या प्रांतांत मुक्काम केला होता असा तर्क होतो.

महंमुदाचा जोंपर्यंत तेथें मुक्काम होता, तोंपर्यंत कित्येक सरदार तिकडेच आपली वस्ती ठेवण्याच्या उद्योगांत होते. व त्यांना तें चांगलेंच फायदेशीरही झालें. कारण महंमुदाच्या पराक्रमाचा अनुभव त्या बाजूस फार होता; यामुळें महंमुदाच्या नांवावरच कित्येक सरदार लहान सहान गांवाचे मालक होऊन बसले. अयोध्येच्या इतर संस्थानिकांचें त्यांच्याकडे फारसें लक्ष नसे. कारण महंमूदासारखा प्रबळ शत्रूच त्यांना फार त्रास-दायक झाला होता. आणि त्याला तर तेथून हांकून लावणें जरूर होतें. ह्याच संधींत कुतुबनेंही कांहीं गांव बळकावून तो त्यांचा अधिपती झाला. असो, आतां मूळ गोष्टीकडे वळूं.

सज्जनसिंहानें पठाणांबरोबर अनेक लढाया मारून किसोरा संस्थानाचा अनेकवेळां बचाव केला होता. कानपुरावर चाल करून जाणाऱ्या टोळ्या अर्धांशानें किसोरावरही येऊन आदळत; पण सज्जनसिंहाच्या मानीपणा-पुढें व शूरत्वापुढें त्याचा टिकाव लागत नसे. किसोरा संस्थान लहानसेंच पण सुपीक होतें. कारण परमपवित्रा पुण्यसलिला गंगानदीचा जलप्रवाह किसोराच्या अगदीं लगत्यानें वाहत होता, त्यामुळें किसोरा संस्थान सुसमृद्धित होतें.

सज्जनसिंहानें किसोरा शहराला एक मजबूत तट बांधविला होता. व लष्करी बंदोबस्त फारच कडक रीतीनें ठेविला होता. पठाणांनीं कितीहि यत्न केले तरी किसोराचे स्वातंत्र्य आपल्या डोळ्यांदेखत जाऊं द्यावयाचें नाहीं हा सज्जनसिंगाचा मोठा निश्चय होता.

अशा तेजस्वी रजपूतवीराचीं मुलेंही तेजस्वी बाण्याचीं होतीं. लक्ष्मण-सिंग तर अगदीं आपल्या पित्याच्या वळणावर गेला होता. आणि ताज-कुंवरनेंही क्षात्रकर्मांत नपुण्य संपादन केलें होतें. ती शरसंधान करण्यांत इतकी कुशल होती कीं, पौराणिक शरसंधाननिपुण स्त्रियांइतका मान,

रजपूत तिला देत होते. व ते ताजकुंवरला " देवकन्या " समजत असत. आणि एकदां तर म्लेंच्छाशीं युद्ध होऊन, त्यांत जय मिळवून ती किसो-राच्या वेशींतून डाव्या हातांत शत्रूंच्या रक्तानें आरक्त झालेला लांबलचक भाला धरून, व उजव्या हातांत रक्तमांसानें थबथबलेली तलवार धरून, घोड्यावर स्वार झालेली ही देवकन्या पाहून सर्व लोकांनीं तिचा जयजयकार केला !

लक्ष्मणसिंग व ताजकुंवर यांची माता त्यांना लहानपणींच आंचवली होती, तरी हीं बहीणभावंडें आपसांत फार गोडीनें व आनंदानें रहात असत. ह्या दोघांनाही मृगयेचा फार नाद लागलेला होता.

एके दिवशीं भगवान् अंशुमाली अस्तास जाण्यास एक तासाचा अव-काश होता, अशा वेळीं शस्त्रास्त्रयुक्त घोड्यावर स्वार होऊन, हीं दोन्हीं भावंडें पित्याची आज्ञा घेऊन, पवित्रसलिला गंगेच्या आसमंतांतील प्रदेशांत शिकारीकरितां निघालीं. किसोराच्या ज्या भागांतून गंगेचा प्रवाह वाहत होता; त्या प्रदेशांत तीं दोघें गेलीं. त्यांचे अश्व हळूहळू चालले होते. सायंकाळचा शीतळ वारा खात खात तीं एका ओढ्याजवळ आलीं. त्यावेळीं या उभयतांत वाक्लीला चालली होती.

" काय, ताई ! तूं माझ्यापेक्षां अधिक पठाण मारशील म्हणतेस ? "

" होय ! अगदीं तुझ्यापेक्षां एकतरी ज्यास्तच मारीन "

" पण, ताई ! तुला पुरुषांचं बळ कुठं ठाऊक आहे ? "

" मग मला काय तूं अगदींच निर्बल समजतोसरे भाऊ ? खचित मी तुझ्यापेक्षां अधिक पठाण मारीन ! "

इतक्यांत चमत्कार काय सांगावा ? " ए काफीर मू संभालकर बोल " असे उद्गार पलिकडच्या तृणराशींतून ऐकूं येऊन दोन गरगरीत धोंडे सूं सूं करीत लक्ष्मणसिंगाच्या घोड्याच्या मानेवर येऊन आदळले. हा चमत्कार पाहून तीं दोघें क्षणभर स्तब्ध राहिलीं, पण त्यांना तो सगळा प्रकार लवकरच कळून आला. पठाणांना पाहतांच ताजकुंवर हास्य करून म्हणाली.

" भाऊराया ! पहात्यें आतां कोणाची तलवार पठाणांचीं मस्तकें ज्यास्त तोडते ती ! "

५०५

" ताई ! मग पाहाच आतां ! " असें म्हणून व तोंडानें " ये नोडग्या, रजपुतांना काफीर म्हणतोस काय ? संभाळ आतां आपली जबान " असें म्हणून त्यानें आपला घोडा त्यांच्या आंगावर घातला. दोघांनींही आपलीं शस्त्रें सज्ज केलीं. इतक्यांत ते १०।१२ पठाणही त्यांच्यावर लाठ्या घेऊन धांवले. पण त्यांचा कांहीं एक इलाज चालला नाहीं. ताजकुंवरच्या व लक्ष्मणसिंगाच्या तीक्ष्ण भाल्याला पहिल्याच सपाट्याला तीन व पांच पठाण बळी पडले ! लक्ष्मणसिंग ताजकुंवरला हर्षानें म्हणालाः—ताई, तुझी बाजू अखेरीस कमीच ! मानी बालिकेला ते शब्द फारच लागले; व तिनें तत्काळ आपलें शरसंधान चालवून आणखी दोन पठाण ठार केले ! बाकीचे दोघे जीव घेऊन धूम पळाले ! अखेरीस शिकारीची बरोबरी झाली, तेव्हां अर्थात्च दोघांमधील तंटा मिटला. नंतर तीं हर्षित होऊन राजवाड्याकडे परत आलीं. सज्जनसिंगाला ती हकीकत ऐकून मोठा आनंद व अभिमान वाटला.

तो दिवस तर आनंदांत निघून गेला; पण सगळेच दिवस आनंदांत जातील असें नाहीं. आज आपण आनंदसागरांत पोहत आहोंत; उद्यां पोहूं किंवा नाहीं तें सांगता यावयाचें नाहीं. कारण आनंद व दुःख, हास्य व रुदन, संपत्ति व आपत्ती हे प्रकृतीचे क्षणाक्षणाचे खेळ आहेत.

" कालस्यकुटिलागतिः " दुसरा दिवस उजाडतो न उजाडतो तोंच किसोरावर नवीन संकट येऊन आदळण्याची चिन्हें दिसून येऊं लागलीं. मागें सांगितलेले दोन पठाण पळून गेले. त्यांनीं कुतुबपुढें आपल्या दुर्दशेचें यथातथ् वर्णन केलें. तें ऐकून कुतुबला आपला कार्यक्रम साधून घेण्याची आयती संधी प्राप्त झाली. कारण किसोरा किंवा किसोरानगराला ललामभूत झालेली स्वरूपशालिनी वीरकन्या ताजकुंवर ही आपणांस प्राप्त व्हावी ही त्याची पहिल्यापासून इच्छा होतीच. तत्काल त्यानें लढाईची तयारी करण्याचा सरदारांस हुकूम दिला ! व सज्जनसिंगास निरोप पाठविला कीं, "तुझ्या मुलीनें माझ्या प्रजेला फार त्रास दिल्याचें मला कळलें आहे. तेव्हां तुला, आपली स्वतंत्रता कायम राहावी अशी इच्छा असल्यास, तूं आपली मुलगी माझ्या स्वाधीन कर. नाहींपेक्षां आतांच लढाईला तयार हो " हा उद्धट निरोप ऐकून सज्जनसिंगाला व त्याच्या अनुयायांना फारच क्रोध आला. त्यांनीं त्या निरोपाला प्रत्यूत्तर केलें कीं,

"सगळें किसोरशहर आपले प्राण देईल पण आपल्या कुलास कलंक लागेल असें कृत्य करणार नाहीं. दुष्ट यवनांचा नाश करण्यासाठींच रजपूतांचा जन्म आहे." हा निरोप ऐकून कुतुबचा क्रोध बळावला, मोठी थोरली सेना घेऊन तो किसोरावर चाल करून आला! किसोरावर हें मोठेंच संकट आलें!

पण रजपूत वीर मुळींच भ्याले नाहींत, त्यांनींही तयारी ठेविलीच होती. मरेपर्यंत स्वाधीनतेचें रक्षण करावयाचें हा त्यांचा पक्का निर्धार होता. प्रत्येक रजपूत वीर आपल्या पवित्र कुलाकरितां, प्राणाहून प्रिय अशा स्वाधीनतेकरितां, व स्वदेशभूमीकरितां "शरीरं पातयेयम् कार्यं वा साधयेयम्" अशा दृढनिश्चयानें शस्त्रयुक्त होऊन शत्रूंची मार्गप्रतिक्षा करीत शहराच्या तटाच्या आंत जमा झाले होते. नंतर शत्रूंनीं तटाच्या बाहेरून किसोराला वेढा दिला. व पुन्हां निरोप पाठविला कीं, "अझून तरी शहाणे व्हा, व ताजकुंवरला आमच्या स्वाधीन करून स्वाधीनतेचा बचाव करा!" पण असला उपमर्द सहन करण्याइतके रजपूत वीर भ्याड नव्हते, "आम्ही आमच्या स्वाधीनतेचा बचाव युद्धानेंच करूं" असा रजपुतांनीं सणसणीत जबाब दिला. झालें! आतां युद्धाविना गतीच उरली नाहीं. युद्ध सुरू झालें.

यावेळीं उत्तरेच्या बाजूस एका उंच बुरुजावर दोन तरुण आपले धनुष्यबाण सज्ज करून उभे होते. दोघांची ऐट फारच पहाण्याजोगी होती. दोघांचे चेहरे फारच मनोहर दिसत होते; परंतु त्या दोन तरुणांपैकीं एकाच्या चेहऱ्यावर सौकुमार्याची छटा ज्यास्त चमकत होती. त्याचा चेहरा मोठा नयनमनोहर होता! वाचकवृंद! हा तरुण कोण बरें असावा? तो तरुण दुसरा कोणी नसून ती वीरवेषधारिणी वीरकन्या आमची कथानायिका ताजकुंवर होती बरें? तिच्या नेत्रांतून या वेळीं प्रत्यक्ष अग्निचाच वर्षाव होत होता. युद्ध सुरू होतांच यवनांनीं प्रथम तटाच्या द्वारांवर हल्ला करून तें फोडून मार्ग केला; व ते आंत शिरूं लागले. रजपूतांनीं मोठ्या पराक्रमानें त्यांना दोन वेळ मागें हटविलें. पण अखेरीस शत्रूंनीं आंत प्रवेश केलाच, नंतर बरेंच युद्ध होऊन सज्जनसिंग त्यांत पडला, व रजपुतांची बाजू कमी पडली.

इकडे बुरुजावरून ताजकुंवर व लक्ष्मणसिंग शत्रूंवर तीक्ष्ण बाणांचा एकसारखा वर्षाव करीत होते. सज्जनसिंग पडतांच यवनदळांत जयध्वनि होऊं लागला; व सर्व शहरभर यवनसैन्य पसरलें. बाणांच्या वर्षावानें शत्रूंकडील अनेक लोक मरूं लागले. त्यांचें तें हस्तलाघव पाहून कुतुब चकित होऊन पाहूं लागला. लगेच कुतुबनें आज्ञा केली कीं, "सरदारहो! तुम्हीं कसेंहीकरून त्या बालतरुणाला (ताजकुंवरला) जिवंत धरा जा. जो हें काम करील त्याला मी बक्षिस......" कुतुब धाडकन् जमीनीवर निचेष्ट पडला. लोकांनीं त्याला सावध करण्याचा प्रयत्न केला, पण पडतांक्षणींच कुतुबचा प्राण गेला होता; कुतुबनें ताजकुंवरला दाखविण्यास विच्याकडे बोट केलें, व तें कुंवरनें पाहतांक्षणींच बाण मारून त्याला तेथच्या तेथेंच ठार केलें. त्या वेळीं कुतुबचे प्यारे अनुयायी दीन दीन करीत त्या बुरुजावर वेगानें चालून गेले. या वेळीं ताजकुंवरनें फारच बहादुरी केली. एकंदर ८० पठाण ठार केले; पण यवनसैन्य अगदींच लगट करून आलें असें पाहून तिनें भावास आपलें रक्षण करण्याची विनंती केली. पण आतां रक्षणाचा मार्ग उरलाच नव्हता. वाचक! लक्ष्मणसिंगानें–ताजकुंवर प्रियभावानें तिचें रक्षण कसें केलें पहा? यवनांचा स्पर्श होऊं नये म्हणून त्या देशवीरानें आपली तलवार एकदम उपसली. ममतेचें आवरण दूर केलें; ताजकुंवर यवनांच्या हातून कायमची मुक्त केली. शेवटीं तो बालवीरही लढतां लढतां पडला. अहाहा! राजस्थानांतील सर्व खेडींपाडींही किसोराच्या–ताजकुंवरच्या पराक्रमाचें गाणें अजूनही सद्गदित अंतःकरणानें गातात.

वीरसुता ताजकुंवर विमल कीर्ति भुवनमें ॥
सब राजस्थान, यशोगान गावत है ॥ १ ॥

# राजमाता-मैनलदेवी.

( ३ )

रमणीय पुष्पोद्यानांत अनेक सुंदर सुवासिक कुसुमें प्रफुल्लित झालीं आहेत; पण समीरणच जर वाहत नाहीं तर त्या कुसुमांचा नैसर्गिक सुवास चहूंकडे कसा पसरावा? तद्वतच या पृथ्वीमध्यें अनेक "नररत्नें" जरीं निर्माण झालीं तरी त्यांना "नररत्नें" हें आदरार्थी नाम प्राप्त होण्याला मातृशिक्षणच जर नसतें, तर त्यांची "नररत्नें" असें ह्मणवून घेण्याची योग्यताच झाली नसती! असो.

जगन्नियंत्यानें निर्माण केलेल्या मानवी सृष्टींतील आधिदेवता माता होय. सुशिक्षित किंवा अशिक्षित राष्ट्रांतील कोणतेहि पुरुष "नरश्रेष्ठ" या उच्चतम पदाला पावलेले असोत; त्या सर्वांस कारण एकच असून, तें मातृशिक्षणच होय. सुशील माता आपल्या मुलांसच सुशीलत्व लाभवून देतात असें नाहीं, तर राष्ट्रालाही सुशीलत्व देऊन त्याला जगन्मान्यत्व लाभवून देतात. महाराष्ट्राला एवढें महत्व कशामुळें? शिवाजी महाराजांमुळें. शिवाजी महाराजांच्या अंगीं महत्व येण्यास कारण कोण? त्यांची सुशील माता जिजाबाई. सारांश, "जिच्या हातीं पाळण्याची दोरी, तीच देशाला उद्धरी" अशी जी एक ह्मण आहे, ती सर्वथैव खरी आहे.

गुजराथदेशचा प्रसिद्ध राजा कर्णराज याची स्त्री मैनलदेवी ही होय. त्या देशांत मैनलदेवीची कीर्ति फार आहे. हिचा पुत्र सिद्धराज जयसिंग हा होय. हाही अत्यंत प्रख्यात राजा होऊन गेला. हा अल्पवयाचा असतां याचा पिता कैलासवासी झाला. (१०९४) पुढें मैनलदेवीनें आपल्या पतीचा कारभार आपल्या हातांत घेऊन आपल्या मुलाला आपल्या सुंदर उपदेशानें सन्मार्गाला लावून जगप्रसिद्ध केलें. मैनलदेवी ही फार सुविचारी, उदार व थोर मनाची राणी होती. तिचें वर्तन तिच्या पदाप्रमाणें असे. प्रजेचें कल्याण करण्यांत ती नेहमीं रत असे. असो.

राजमाता मैनलदेवी हिचें चरित्र वाचकांपुढें मांडीत आहे. राजमाता जिजाबाई व राजरत्न शिवाजी महाराज; यांची महती महाराष्ट्रांत जेवढी आहे तेवढीच राजमाता मैनलदेवी व राजरत्न सिद्धराज यांची महती गुजराथदेशांत आहे. शिवाजी महाराज जसे महाराष्ट्राचे गौरवसूर्य होते, तसेच सिद्धराज गुजराथदेशाचे सूर्य होते. राजमाता जिजाईच्या चरित्रापासून जितक्या गोष्टी आमच्या महाराष्ट्र भगिनींना शिकावयास सांपडतील, तितक्या गोष्टी जरी राजमाता मैनलदेवी हिच्या चरित्रापासून सांपडल्या नाहींत, तरी ह्या अल्पचरित्रावरून मैनलदेवीच्या सच्चरित्राचें अनुमान करणें सुलभ होईल अशी माझी पूर्ण समजूत आहे. आणखी आमच्या वाचकांना मी येथें एवढेंच सुचवून ठेवितों कीं, ह्या चरित्राचा अनेकांश इतिहासांतील असून फक्त योग्य स्थळीं शोभतील असेच विचार ग्रथित करण्याचा प्रयत्न केला आहे. ते वाचकांनीं पाहिजे असल्यास ताडून पहावेत.

"चालुक्य अथवा सोळंखी वंशांतील भीमदेवामागें कर्णराज हा गादीवर बसला. त्यानें इ. स. १०७२ पासून १०९४ पर्यंत सुमारें २२ वर्षे शांततेनें राज्य केलें. या अवधींत त्याची परकीय राजांशीं एकादी लढाई किंवा तंटाबखेडा झाल्याचें नांवदेखील नाहीं. त्याचा बहुतेक काळ आपले मांडलिक राजांवर खंडणी वसूल करण्यासाठीं फिरण्यांत गेला. मेवासी लोकांचा बंदोबस्त करण्याची तजवीज मूळारंभीं या राजाच्या वेळींच झाली आहे. पूर्वी या गुजराथदेशांत भिल्ल लोकांची वस्ती होती. कर्णराज गादीवर बसल्यानंतर प्रथमतः तो गुजराथ देशाची खंडणी वसूल करण्याकरितां निघाला होता. त्या वेळीं त्यानें जे लोक चोरीचा धंदा करीत होते व जे लोक जंगली होते, त्यांना वश करून घेतलें. याचे कारकीर्दींत गुजराथेंत चांगले लोकांची वस्ती होत चालली. भिल्ल, कोळी वगैरे जुने रहिवासी हटत जाऊन डोंगरांतून जाऊन राहिले व सपाट ठिकाणचे मेवासी लोकही नाहींसे झाले. धुंधुक्यांत धनमेर नांवाचा एक मोठा कोळी सरदार रहात असे. त्याचे येथें आठ हत्ती होते. हल्लीं ज्या ठिकाणीं अहमदाबाद शहर आहे, त्याजवळ पूर्वी आशापल्ली नांवाचे गांव असून त्यांत एक आशा नांवाचा भिल्ल सरदार रहात असे. त्याच्याजवळ तिरंदाज लोकांची एक मोठी फौज होती. या

सरदारावर हल्ला करून कर्णराजानें त्यास ठार मारिलें. तेथें कर्णराजास शुभ शकून झाले. त्याच्या स्मरणार्थ त्यानें तेथें एक कोचरव नांवाचें देवीचें देवालय बांधिलें. याशिवाय यानें कर्णसागर तलाव व कर्णावती या नांवाचें नगर बांधिलें. व गिरनारच्या पहाडावर कर्णविहार या नांवाचें एक देवालयही बांधिलें आहे."

"दक्षिणेंत चंद्रापूर शहर आहे, तेथील राजा जयकेशी याची कन्या मैनलदेवी इच्याशीं या कर्णराजाचें लग्न झालें होतें. या उभयतांचा लग्नयोग घडून आल्याची हकीकत खरोखर मोठ्या मौजेची व आश्चर्य-कारक आहे."

"एके वेळीं वर सांगितलेला दक्षिणेंतील चंद्रपूरचा राजा जयकेशी याची कन्या मैनलदेवी इनें पित्याच्या "**जा शोधुनि ये वत्से वरुनि मनें मानल्या कुलीनातें** ॥ (मोरोपंतकृत सावित्रीचें आख्यान) या वचना-प्रमाणें आणि "स्व-वर पहाज़ा" या सत्य अनुवादाप्रमाणें राजकन्या मैनलदेवी हिनें स्वतः देशोदेशींच्या राजांच्या तसबिरी मागवून आणिल्या. त्यांतून गुजराथचा राजा कर्ण याची तसबीर तिला फार पसंत पडून त्यालाच वरण्याचा तिचा निश्चय होऊन, "पंत-आर्यार्ध-"**वरिले हेचि चरण म्यां, त्यजितां ज्वलनांत काय हो मीन** ॥" तो तिनें आपल्या ब्राह्मणाबरोबर कर्णराजाला कळविला, व स्वतःचीही तसबीर त्याकडे पाठविली. कर्णराज तिचें स्वरूप पाहून-पंत-आर्यार्ध-"**नरपति निववी नयनें, तल्लावण्यामृतह्रदीं सुचिर**"॥ ....कर्णराजाची अशी स्थिति झाली. व त्यानें त्या ब्राह्मणाचा मोठा सन्मान करून लग्न करण्याविषयीं त्याजवळ रुकार दिला. तो रुकार पोहोंचल्यावरून मैनलदेवी अन्हिलपुरास आली. आणि कर्णराजानें तिच्याशीं लग्न लाविलें. परंतु मागाहून राजाच्या मनांत मैनलदेवीविषयीं अप्रीती उत्पन्न झाली. हें पाहून राज्यांतील लोक आणि कर्णराजाची आई अशीं सर्वजण खेद करूं लागलीं; कीं अशा स्थितीनें राज्य वारसावांचून राहील. मैनलदेवीच्या दुःखास तर पारावर राहिला नाहीं. ती कित्येक वेळां अपघात करून घेण्यासही सिद्ध झाली; परंतु तिच्या सासूनें तिची समजूत करून तिला असें धाडसाचें कृत्य करूं दिलें नाहीं."

"कांहीं दिनावधीनंतर मुंजल प्रधानास अशी बातमी लागली कीं, नमुंजला नांवाच्या नायकिणीवर राजाचें मन जाऊन, तिजविषयीं त्यानें इच्छा धारण केली आहे. त्यावरून त्या चतुर प्रधानानें नमुंजलेच्या मिषानें मैनलदेवीस राजमहालांत आणून दाखल केली. राजानें तिला न ओळखितां ती नमुंजला कलावंतीणच आहे असें समजून तिच्याशीं प्रीतीसंग केला. ते समयीं तिच्या पोटीं गर्भधारण झालें. राणीनें या प्रीतीसंभोगाच्या खुणेकरितां या वेळीं राजाची आंगठी मागून घेतली होती. मागाहून नायकिणीशीं संग केल्याबद्दल राजास फार पश्चात्ताप झाला; व या महादोषाच्या प्रायश्चित्तासाठीं ब्राह्मणांच्या विचारानें राजा, तापविलेल्या पितळेच्या सात मूर्तींस कडकडून आलिंगन देण्यासही सिद्ध झाला. परंतु, मागाहून मुंजलप्रधानानें त्यास खरीखरी हकीकत कळविल्यावरून त्याचें मन शांत झालें. सदरील गर्भधारणापासून मैनलदेवी राणीस पालनपूर येथें पुत्ररत्न झालें. त्याचें नांव सिद्धराज जयसिंग असें ठेविलें होतें."

"सिद्धराज जयसिंग हा अल्पवयस्क ह्मणजे—बाल्यदशेंत असतांच राजा कर्ण हा स्वर्गवासी झाला (इ. स. १०९४). तेव्हां वारसासंबंधीं कांहीं तक्रार उत्पन्न झाली. पण तिचा ताबडतोब निकाल होऊन अखेरीस सिद्धराज जयसिंग गादीवर बसला."

"सिद्धराज जयसिंग लहान असल्यामुळें त्याची आई मैनलदेवी ही राज्यकारभार पहात होती. परंतु तिच्या हातीं राज्यसत्ता येण्यास आरंभीं थोडा विक्षेप आला होता. जयसिंगाच्या बाल्यावस्थेंत प्रथम तर कर्णराजाचा मामा मदनपाळ हाच सर्व राज्यकारभार चालवूं लागला. परंतु मागाहून त्यानें एका लीला नांवाच्या वैद्यास गैरवाजवी दंड केल्याकारणानें तक्रार होऊन एक मंडळी उपस्थित झाली. त्यावेळीं सामतू नांवाच्या एका मंत्र्यानें युक्तीनें बाळराजा जयसिंग यास आपल्या स्वाधीन करून घेऊन मदनपाळास शिपायांचे हस्तें मारून टाकविलें. येणेंकरून राजसत्ता मैनलदेवीच्या हातीं आली."

"त्या वेळेपासून मैनलदेवीनें, सामतू, मुंजन आणि उदा अशा तिघां जैन मंत्र्यामार्फत राज्यकारभार चालविला. तिनें आपल्या कारकिर्दीत

विरमगांवानजीक 'मोनसर' या नांवाचा तलाव आणि धोलका गांवानजीक 'मलाव' नांवाचा तलाव असे दोन तलाव बांधविले. सार्वजनिक कृत्यें करण्यांत तिची कीर्ति आहे."

"मैनलदेवीचा इतिहास उदाहरण घेण्यासारखा आहे. तिचें वर्तन किती न्यायी होतें हें पुढील उदाहरणावरून व्यक्त होईल."

"तलाव बांधवितेवेळीं तलावाच्या पूर्वकांठावर एका कसबिणीचें घर होतें. तें खरेदी घेतलें नाहीं तर तलावाच्या सारखेपणाला अडचण येत होती; ह्मणून त्या घराकरितां राणीनें पुष्कळ द्रव्य देण्यास काढिलें तरी देखील त्या नायकिणीची समजूत न होतां ती ह्मणूं लागली कीं, तुमची जशी तलाव बांधण्याची कीर्ति आहे तशीच त्या कामीं आडफांटा आणण्याची माझी कीर्ति आहे" असें असतांही राणीनें तिजवर काडीभर देखील जुलूम न करितां तलाव तसाच एका बाजूनें वांकडा बांधिला!

मैनलदेवीच्या ह्या निरभिमान वृत्तीला, सहनशीलतेला, व न्यायप्रिय वर्तनाला केवढें महत्व आणि थोरपणा आहे? त्यावरून हल्लीं तिकडील लोकांतही अशा अर्थाची एक म्हण चालत आली आहे कीं, "न्याय पहाणें असेल, तर 'मलाव' तलाव पहावा!"

मैनलदेवीनें पुष्कळ लोकोपयोगीं कृत्यें केलीं. एका प्रसंगीं ब्राह्मणांनीं मैनलदेवीस तिच्या पूर्वजन्मींची कथा सांगितली. ती अशी कीं, "पूर्वजन्मीं तूं ब्राह्मणज्ञातीची स्त्री होतीस; आणि शुक्लतीर्थानजीक भालोड नांवाचें स्थळ आहे तेथें तूं सोमनाथाचे यात्रेस जाण्याकरितां आलीं होतीस; परंतु तेथें ब्राह्मणांनीं तुजपाशीं पुष्कळ कर मागितल्यामुळें तुला सोमनाथाच्या यात्रेस जाववलें नाहीं. याकरितां तेथें तूं उपवास करून देहत्याग केला होतास. आतां या जन्मीं तुझ्या नशिबीं ती यात्रा करण्याचा योग आहे; याकरितां तूं यात्रेस जाण्याची सत्वर तयारी कर."

त्याप्रमाणें मैनलदेवी आपल्या पुत्रास घेऊन भालोड येथें गेली, आणि त्या ठिकाणीं लोकांचा कराचा जुलूम पाहून जयसिंगाच्या हस्तें उदक सोडवून तो कर तिनें बंद करविला. मग तेथून सोमनाथाच्या यात्रेस जाऊन तिनें तुलापुरुष वगैरे अनेक प्रकारचा दानधर्म करून यात्रा परिपूर्ण केली!! अशी तिच्या दानशूरपणाची ख्याती आहे.

आतां विशेष गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, मैनलदेवीनें आपल्या पुत्रास–जरी ती अनेक सत्कार्यें करण्यांत मग्न होती, तरीदेखील उपदेशामृत पाजण्यास–कमी केलें नाहीं. आपल्या पुत्रानें आपल्या पतीचें आपल्या कुळाचें यश वाढवावें ही तिची मोठी इच्छा होती. ती वारंवार त्याला सदुपदेश करीत असे. ती स्वतः न्यायी, धर्मभक्त, ईशभक्तिपरायण असल्यामुळें पुराणांतील उत्तम उत्तम बोध ती आपल्या मुलाला सांगत असे. सिद्धराज जयसिंगाची बुद्धि तीव्र ग्राहक होती, अगदीं बाल्यावस्थेंत पिता टाकून गेल्यामुळें त्याला मातेचाच लळा फार होता. तशांत राजमाता मैनलदेवी ही सुशील व गुणनिधान असल्यामुळें अनेक सद्गुणांचें बीज त्या कोमल बालकाच्या हृदयांत रुजलें गेलें, व पुढें त्याचा विस्तारही सुगुणयुक्त शाखापल्लवांनींच झाला. जयसिंग परमप्रतापी, सद्गुणनिधान, जगद्वंद्य नरपती झाला. व मैनलदेवीची सदिच्छा परिपूर्ण झाली.

तिचा उपदेश नीतीनें, कुलाभिमानानें, सद्वर्तनानें, उदात्त विचारानें, सुधर्मानें, सत्श्रद्धेनें परिप्लुत असाच असे. जयसिंगाला बालपणीं तो विक्रमशाली निपजावा म्हणून तिनें जो उपदेश केला तो ज्याप्रमाणें आर्यमाता विदुला हिनें आपला पुत्र संजय याला केला होता, त्याचप्रमाणें होता. तेव्हां तोच उतारा थोडा बदलून वाचकांना येथें देतों, म्हणजे त्यावरून मैनलदेवीचा सद्हेतु कळून येईल.

ओव्याः—

"स्वपुत्रास म्हणे मैनलदेवी ॥ सद्वचनें त्वां आयकावीं ॥ प्राणभयें तेज हरवी ॥ तो क्षत्रिय कसला? ॥१॥ 'हें तों नव्हे क्षत्रियकर्म' ॥ जयसिंगा 'ऐक क्षात्र-धर्म ॥' रणीं मारिजे शत्रु अधम ॥ अथवा प्राण देईजे ॥२॥ 'युद्धामध्यें अ-पलायन ॥ धर्म हा क्षत्रियांचा जाण ॥ त्याचें कराया प्रतिपालन' क्षत्रें सदा जागावें ॥ ३ ॥ 'दानवंत सत्यवंत ॥ जयवंत यशवंत ॥' ऐसा पोटीं जन्मल्या सुत ॥ माता यथार्थ ती धन्य ॥ ४ ॥ जगीं वाढवी सत्कीर्ती ॥ स्वधर्म चालवी कुशलमती ॥ सर्वदा भजे सत्संगती ॥ धन्य जननी तयाची ॥ ५ ॥ समरीं वाहतां आपुलें शीर ॥ कीर्ती होतसे जगीं फार ॥ म्हणती क्षत्रिय धुरंधर ॥ धन्य जननी तयाची

॥ ६ ॥ रणीं झुंजतां प्राण गेले ॥ देवलोकीं जाऊनि ठेले ॥ स्वर्गींचें राज्य प्राप्त झालें ॥ वंद्य झाले तेथेंही ॥ ७ ॥ .................... ॥ .... .............. ॥ ................ ॥ .................... ॥ ८ ॥ कर्तृत्वहीन नर संसारीं ॥ नव्हे पुरुष ना तो नारी ॥ म्हणोनी प्राण वर्ते शरिरीं ॥ तोंवरी करणी न त्यागिजे ॥ ९ ॥"

असलाच बाणेदार उपदेश मैनलदेवीनें आपल्या मुलाच्या मनांत बिंबवून त्याला महान् पराक्रमी केलें! असल्या माता हल्लींच्या काळीं किती बरें सांपडतील? परंतु अगदींच निराश होतां कामा नये. परमेश्वराची भरतखंडावर कृपा झाल्यास अझूनही कित्येक नरनारीरत्नें पैदा होतील. आर्यमाता विदुला, राजमाता जिजाई, किंवा मैनलदेवी अशा जगत्वंदनीय माता भरतखंडांतच निर्माण झाल्या; व त्यांनीं आपल्या सुशीलपणानें आपले पुत्र सुशील, व दिग्विजयी केले आहेत. भरतखंडांतील प्रत्येक मनुष्याला असल्या मातांचा विसर पडणार नाहीं. अशी माझी पूर्ण समजूत आहे. असो.

आर्यमाता मैनलदेवी हिनें आपल्या पुत्रास उपदेश करून श्रेष्ठत्वास पोंहोंचविलें, तो उपदेश लेखकानें स्वतःच मैनलदेवीच्या मुखानें वदविला हें तर वाचकांस ठाऊक आहे; पण लेखकानें एवढें हें जें धाष्टर्य केलें आहे, त्याला उत्तम पुरावा असल्याशिवाय केलें नाहीं हें मात्र विसरतां कामा नये. ( १ ) मैनलदेवी राज्यकारभार वाहण्यांत तरबेज होती हें मागील तिच्या वर्तणुकीवरून तुह्मांस कळेल. ( २ ) मलाव तलावाच्या वेळचें तिचें न्यायी वर्तन तुह्मांस कळेल. ( ३ ) सार्वजनिक कृत्यें करण्याची मैनलदेवीला जशी हौस होती, तशी तिच्या पुत्रालाही होती हे पुढें कळेल. ( ४ ) जयसिंगराजा एवढा शूर झाला, त्याला कारण त्याची माता मैनलदेवीच होय. तिनें त्याला–ज्याप्रमाणें जिजाईनें शिवबाला, तो पराक्रमी निपजावा म्हणून उपदेश केला आहे, त्याप्रमाणेंच–क्षत्रिय धर्म समजावून सांगितला नसेल असा तर्क केव्हांहि काढतां येणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर एका लढाईत खुद्द मैनलदेवी आपल्या पुत्रास लढाईत जय मिळविण्याचा सल्ला देत होती, हेंही पुढें कळेल.

वरील दाखले देण्याचें कारण हेंच कीं, कोणी म्हणतील लेखक लटकेंच लिहितात. पण तसें नव्हे. जें आपणांस खचित सत्य वाटत

आहे तें किंवा ज्याच्या सत्यत्वाबद्दल आपली पक्की खातरी आहे तें आपण आपल्या लेखांत प्रसिद्ध करण्यास कोणाचीही भीड धरूं नये असें माझें मत आहे; व म्हणूनच हा मी प्रयत्न केला आहे. मैनलदेवीच्या उपदेशाची जी मालिका मी देणार आहे ती जरी कदाचित् नवीशी वाटली नाहीं तरी ती आमच्या वाचकांस ग्राह्य होईल असा मला भरंवसा आहे. म्हणून ती मी येथें देतों. तिचा उपदेश येणेप्रमाणें आहे——

(१) जयसिंगा, कोणतेंही कार्य आरंभिण्यापूर्वी हृदयांत ईश्वराचें स्मरण करावें. जीं सत्कार्यें आहेत. तीं तडीस नेण्याचा झटून यत्न करावा.

(२) मुला ! शरीरसंपत्ति चांगली राखण्याकडे लक्ष द्यावें. क्षत्रियोचित शारीरिक कृत्यें नित्य नियमानें करीत जावींत.

(३) पुत्रा ! पूर्वजांचा इतिहास नेहमीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवावा. व आपल्या पूर्वजांचीं सत्कृत्यें व त्यांचें यश हीं वाढविण्यांत आपलें आयुष्य खर्चावें.

(४) सुपुत्रा ! सत्कृत्यानें स्वर्गप्राप्ति, व सत्कीर्ति यांची प्राप्ति होऊन सुख होतें, व दुष्कृत्यानें दुष्कीर्ति होते व नरक प्राप्ति होऊन दुःख भोगावें लागतें.

(५) जयसिंगा ! सज्जनांचा नेहमीं गौरव करून त्यांच्या सहवासाला रहावें, त्यांचा सहवास हितकारी व सुखकर आहे. दुर्जनांचा धिःकार करून त्यांच्या वाऱ्यालाही उभें राहूं नये; कारण त्यांचा सहवास अहितकर व दुःखदायक आहे.

(६) पुत्रा ! माता, पिता, साधुसंत, हे देवासमान मानून त्यांच्या ठायीं आदरबुद्धि असूं द्यावी.

(७) राजपुत्रा ! राजासनासमीप, स्वार्थी, असाधु, भेदी असे लोक अगदीं असूं नयेत, तर निस्पृह, निःस्वार्थी, सज्जन, निर्भिड, स्पष्टवक्ते व इमानी, राजनिष्ठ लोक असावेत.

(८) राजतनया ! आपलें भाषण नेहमीं मधुर, आदरशब्दांनीं भरलेलें असावें, त्यांत कटुत्व, व निष्ठुरता मुळींच नसावी. मधुर भाषणानें एखादें कार्य लवकर तडीस जातें, कठोर भाषणाच्या

परिणाम कदाचित भयंकर होतो. याकरितां शत्रूंशींही मृदु भाषण करावें.

(९) राजनंदना! राजसभेंत राजा नेहमीं विद्वान्, बहुश्रुत, धर्मनिष्ठ, सत्यनिष्ठ, नीतिपरायण, अशा जनांनीं वेढिलेला असावा.

(१०) क्षात्रनंदना! लोककल्याणार्थ धर्मशाळा, विहिरी, अन्नछत्रें, सदावर्तें, वगैरे सोयी राजानें केल्या पाहिजेत.

(११) क्षात्रकुळटिळका! प्रजा नेहमीं संतुष्ट राहील असेंच वर्तन राजाचें असलें पाहिजे. प्रजेला दुःख देणारे, प्रजेचें वित्त हरण करणारे, प्रजेचें सुखदुःख न जाणणारे, राजे, दुष्कीर्तिप्रत व अपजयाप्रत पावून अधोगतीस जातात.

(१२) हे क्षात्रकुलवंतसा! परस्त्री व परद्रव्य यांकडे राजाचें मन केव्हांहि जाऊं नये.

(१३) हे क्षात्रकुलदिवाकरा! नीच लोकांकडेस जी जी करण्याचा प्रसंग कधींच आणूं नये.

(१४) हे क्षात्रकुलभूषणा! दुरितपथापासून परावृत्त करणारे तेवढे सन्मित्र मानावेत.

(१५) हे क्षात्रकुलललामा! कुलाभिमान व सज्जनांचा सहवास ह्यांचें जिवापलीकडे संरक्षण करावें.

(१६) हे क्षात्रकुलवरा! परशत्रूवर स्वारी करणें ती बलाबल पाहून करावी.

(१७) हे क्षत्रधर्म-पा! ज्या ठिकाणीं दया, क्षमा, शांती हीं आहेत त्या ठिकाणीं ईश्वर आहे असें तूं समज.

(१८) हे क्षात्रकुलदीपका! राज्य समृद्धि करण्याचीच महत्वाकांक्षा राजानें धरावी.''

येणेंप्रमाणें राजमाता मैनलदेवी हिचा आपल्या पुत्रास उपदेश आहे. असो.

मैनलदेवीचा इतिहास आतां थोडाच आहे. वर लिहिल्याप्रमाणें राणी मैनलदेवी सोमनाथाची यात्रा आटोपून आपल्या पुत्रासह देवनगरींत

येऊन दाखल झाली. या वेळीं माळव्याच्या यशोवर्म राजानें गुजराथ-देशाच्या उत्तर भागावर हल्ला केला. ह्या वेळीं सामतू कारभारी अन्हिलवाड्यास होता. त्यानें आपलें सामर्थ्य जाणून यशोवर्म राजास पैसा देऊन परत लाविलें. हें वर्तमान जयसिंगास कळलें तेव्हां त्या तेजस्वी राजपुत्रास तें अगदीं खपलें नाहीं. त्यानें माळवाप्रांत सर करण्याचा निश्चय केला, व त्यानें त्याप्रमाणें तो स्वारी करून काबीजही केला ! कोण हा मानीपणा ! काय हें क्षात्रतेज ! !

माळवाप्रांत पूर्णपणें काबीज करून यशोवर्म राजाला कैद करून, मोठा पराक्रम करून, अनेक देश जिंकून, शूर जयसिंग आपल्या प्रियमातेसह मोठ्या हर्षानें व उत्साहानें स्वनगरांत प्रवेश करिता झाला; त्यावेळीं अनेक भाटांनीं राजाच्या यशाचें मनसोक्त वर्णन केलें. श्वेतांबरींत हेमाचार्यानेंही गुजराथच्या राजांची कीर्ति गाइली होती. हेमाचार्य हा एक मोठा जैनसाधु होता.

जयसिंगानें त्रिपुरुषप्रासाद, रुद्रमहाकाल, वगैरे देवालयांचा जीर्णोद्धार केला. जयसिंगाची धर्मबुद्धि किती जागृत होती हें यावरून कळून येईल.

सौराष्ट्रांत गिरनारचा राजा खेंगार याच्यावर सिद्धराजानें मोठा जय मिळविला होता. या लढाईचें कारण "राणकदेवी" ही होय. ही एक अत्यंत लावण्यवती स्त्री होती. तिचा विवाह सिद्धराज जयसिंगाबरोबर व्हावयाचा होता, पण खेंगारानें बलात्कारानें तिच्याशीं लग्न लाविलें. त्याचें शासन करण्याकरितां जयसिंग मोठ्या सैन्यानिशीं सौराष्ट्रावर गेला. या स्वारींत त्यानें बरेच किल्ले व तलाव बांधिले. लढाई बारा वर्षे चालली होती. या वेळीं राजमाता मैनलदेवी हीसुद्धां बरोबर होती. तिनें जयसिंगाला अनेक मसलती सांगितल्या, व पुष्कळ उपाय केले; परंतु पुढें खेंगारच्या भावाचा आपल्या मामाशीं बेबनाव होऊन त्यानें शहराचे दरवाजे खुले केले व तो बाहेर पडला. त्या बरोबर जयसिंगानें शहरांत शिरून खेंगारास मारून सोरठ देश घेतला.

खेंगार मेल्यावर राणकदेवी जयसिंगाच्या कबज्यांत आली. तिला राजानें विचारिलें, "तुझी काय इच्छा आहे ?" तिनें ह्मटलें. "तूं इच्छेप्रमाणें कबूल करशील तर सांगतें" राजानें "होय" ह्मटल्यावर तिनें ह्मटलें, "नवऱ्याच्या अस्थि मजजवळ आहेत त्यासह मी सती जावें अशी

म्हझी इच्छा आहे." त्या प्रमाणें वढवाण येथें भोगावा नदीवर ती सती गेली.

या राजाच्या कारकीर्दीत धर्मसंबंधीं वादविवाद चालत असत. हे वाद विशेषेंकरून जैनब्राह्मण यांच्यामध्यें चालत. जैन धर्माच्या ज्या दोन शाखा दिगंबर आणि श्वेतांबर म्हणून आहेत त्यांच्या दरम्यान विशेषेंकरून बराच वादविवाद होत असे. कुमुदचंद्र नांवाचा दिगंबर साधु यावेळीं मैनलदेवीच्या माहेरघरा (कर्णावती) कडून अन्हिलवाड येथें आला होता. त्याजबरोबर श्वेतांबर साधु देवसूरी आणि हेमाचार्य यांचा वादविवाद करविण्यासाठीं राजानें सभा भरविली. त्या वादांत कुमुदचंद्र पराजित झाला. आपल्या माहेराकडून आलेल्या कुमुदचंद्र साधूचा पराभव झालेला पाहून मैनलदेवीस थोडें वाईट वाटलें व तिनें त्याचा पक्ष उचलून धरिला. परंतु हेमाचार्यानें तिची समजूत घातली, तेव्हां कुमुदचंद्राचा पक्ष तिनें सोडला. यावरून मैनलदेवीला धर्मसंबंधीं उत्तम ज्ञान असावें हें आपणांस कळून येईल. मैनलदेवीचा इतिहास येथेंच पुरा होतो. तिचा मृत्युकाळ इतिहासांत उपलब्ध नाहीं, हें गुजराथ देशाच्या इतिहासाचें दुर्दैव होय. असो, शेवटीं सिद्धराजाच्या सहनशीलपणाबद्दलच्या एक दोन गोष्टी सांगून ही हकीकत पुरी करितों.

(१) "माळव्यास जात असतां आपला मोठा रथ घांटांतून चालणार नाहीं, असें समजून, त्यानें तो रथ मार्गांत 'वाराही' गांवीं ठेऊन त्याचें जतन करण्याविषयीं तेथील सर्व लोकांस शिफारस केली. तो रथ गांवच्या लोकांपैकीं कोणीतरी एकानें सांठवून संरक्षण न करितां शिफारशीप्रमाणें सर्वांनीं त्या रथाचे तुकडे करून एकेक तुकडा प्रत्येकानें सांठवून ठेविला. राजा परत येऊन जेव्हां त्यानें त्या रथाची सदरील दशा पाहिली तेव्हां त्यास खेद वाटला; परंतु रागाऊन त्यानें कोणासही शिक्षा न करितां तो त्यांस "मूर्ख अहां" एवढेंच मात्र म्हणाला."

(२) "पाटणानजीक 'उंजा' नांवाच्या गांवीं राजाचा मुकाम पडला होता. या गांवीं कुणबी लोकांची वस्ती फार होती. राजा जयसिंग यात्रेकरूंच्या वेषानें गांवांत जाऊन चावडींत लोकांच्या गोष्टी ऐकत बसला. तेथें सर्व गांवढळ जमून गप्पा मारीत बसले होते. त्यांतला एकजण

म्हणाला, "आपला राजा विद्वान् लोकांस चांगला आश्रय देतो. तो मोठा दयाळु असून पदरच्या लोकांवर त्याचा बहुत प्यार आहे; व तो वस्तींतील प्रजाजनांस बहुत सुख देतो. वगैरे सर्व गोष्टी ठीक आहेत, पण फक्त उणीव इतकीच कीं, त्याच्या पोटीं पुत्रसंतति नाहीं!" राजा कांहीं एक न बोलतां मुक्कामास गेला.

(३) दुसऱ्या दिवशीं सर्व लोक राजाच्या भेटीस तंबूवर गेले. राजा बाहेर येण्यास थोडा वेळ लागला, तितक्यांत ते गांवढळ लोक नेहमींप्रमाणें एकाद्याच्या घरीं गेले म्हणजे खाटल्यावर जाऊन बसतात, त्याप्रमाणें तेथें राजाची सुंदर शय्या बिछावलेली होती, तीवर जाऊन बसले! तें पाहून राजाच्या लोकांनीं त्यास धमकावलें, पण त्या धमकावणीला त्यांनीं मुळींच भीक घातली नाहीं. राजानेंही त्यांस पाहिलें, पण तो एक चकार शब्दही त्या लोकांस बोलला नाहीं.

या गोष्टी वाचून जयसिंगाच्या आईनें त्याच्या सद्वर्तनाबद्दल किती काळजी घेतली असेल याची कल्पना तुह्मी करा. खरोखरच धन्य असो अशा मातांची आणि त्यांच्या सत्पुत्रांची! राजमाता मैनलदेवीच्या बोधामृताचें पान करून राजा जयसिंगानें 'जस्टिस् फॉर्बस' साहेबांसारख्याकडून "सर्व हिंदू लोकांत श्रेष्ठ राजा" व भाटांकडून "गुजराथ देशाचें भूषण" "चालुक्य वंशाचा कुलदीप" असें ह्मणवून घेतलें.

# उमाबाई दाभाडे.

( ४ )

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींत कित्येक नामांकित स्त्रिया निर्माण झाल्या आहेत. त्यांपैकीं कित्येकांचें वर्णनीय शौर्य, वंदनीय पातिव्रत्य, अपूर्व स्वार्थत्याग, अलौकिक धर्माभिमान व स्वदेशभक्ति, हीं पाहतां ज्या देशांत अशीं सद्‌गुणसंपन्ननारीरत्नें निर्माण झालीं आहेत, त्या देशाला "सुवीरप्रसूभूमि" हें थोर नांव मिळावें यांत आश्चर्य नाहीं! जगन्नियंत्यानें कित्येक अमोलिक रत्नें जर जमिनींत निर्माण करून ठेविलीं आहेत, तर तो अतिश्रेष्ठ अशा मानव जातींत श्रेष्ठ नरनारीरत्नें निर्माण करील यांत मोठें नवल तें काय ? परंतु आपणाला जातीकडे पहावयाचें नाहीं, त्यांच्या कर्तृत्व-शालीनतेकडे पहावयाचें आहे. मग तीं मानवरत्नें कोणत्याही श्रेष्ठ जातींत निर्माण झालेलीं असोत, अगर हीन जातींत निर्माण झालेलीं असोत, तीं आपणांस सर्वथैव वंदनीय आहेत. व म्हणूनच परकीयांनींही आमच्या देशांत निर्माण झालेल्या नरनारी श्रेष्ठांविषयीं आदरोद्गार व धन्योद्गार काढले आहेत हें आपण विसरतां कामा नये. इंदोरची राणी अहिल्याबाई, बायजाबाई शिंदे यांच्या सद्गुणांची व सद्धैर्याची कीर्ति मोठमोठ्या विदेशीय ग्रंथकारांनीं गाइली आहे व असें सिद्ध केलें आहे कीं, "आर्यावर्तातील सर्वगुण-संपन्न स्त्रियांची, आमच्या देशांतील स्त्रियाही सरशी करूं शकणार नाहींत" हें वाक्य मोठें महत्वाचें, व अभिमान बाळगण्याजोगें आहे. असो. शूर व मानी स्त्रियांत उमाबाई दाभाडे या वीरांगनेचा समावेश करण्यास कांहीं हरकत नाहीं.

प्रथम उमाबाईच्या कुलवृत्तांताकडे वळूं.

क्षात्रकुलतिलक शिवाजीमहाराज हे तर सर्व विश्वाच्या परिचयाचे आहेत. हे मोठे गुणग्राहक व सद्गुणांचे परिक्षक होते. सद्गुणी माणसाची कीर्ति ऐकिली म्हणजे त्यांना विशेष आनंद होई व ते त्याबद्दल मनांत

आदर बाळगीत. चांदण्या रात्रीं आकाशाकडे नजर केली ह्मणजे असंख्य तारकासमूहांत प्रकाशयुक्त चंद्र, अगर दिवसा दिसणारा तेजस्वी सूर्य, एकदम दृष्टीपुढें दिसावा, त्याप्रमाणें असंख्य लोकसमुदायांत कोणता मनुष्य गुणी किंवा दुर्गणी हें महाराजांच्या तीव्र दृष्टीला तेव्हांच कळून येई. ह्या तीव्र व सद्गुणपरीक्षक दृष्टीनें दाभाडे आडनांवाच्या मराठे जातींतील येसूपाटील दाभाडे यांना महाराजांनीं वर सांगितल्याप्रमाणें निवडून काढिलें होतें; तेव्हां येसबाच्या अंगच्या विलक्षण गुणांचें ज्यास्त वर्णन करणें नको. दाभाडे हे कुलवंत मराठ्यांपैकीं आहेत. त्यांचा वंश भानुवंश होय. येसबाला महाराजांनीं आपला हुजऱ्या केला. तो मोठा शूर व नेकजात होता. शिवाजी महाराजांची त्याच्यावर फार मर्जी असे. ते त्याचा चांगला गौरव करीत असत. आणि येसबाही " **धन्य धन्य तोचि दिवस। स्वामी स्वमुखें गौरवी विशेष॥**" असें मानून आपली कामगिरी मोठ्या आनंदानें बजावीत होता. परंतु ! असल्या स्वामीभक्त सेवकाचा महाराजांच्या कारकिर्दीत उदय व्हावा, असा ईश्वरी संकेत नसल्यामुळें, येसबाच्या दुर्दैवानें महाराज त्याला लवकरच अंतरले.

शिवाजी महाराजांच्या मागून संभाजी राजे गादीवर अधिष्टित झाले. पण त्यांनीं गादीचा उपभोग फार थोडीं वर्षें घेतला. येसबा कांहीं दिवस यांच्याही पदरीं होता. पुढें संभाजीच्या नंतर त्यांचे धाकटे बंधु राजाराम हे गादीवर बसले. तेव्हां सुद्धां येसबा राजारामाचा हुजऱ्या होता. गुणी माणूस कोठेंही असो, त्याच्या गुणाचा त्याला चांगला मोबदला हा मिळावयाचाच. राजाराम महाराजांचीही ह्या इमानी हुजऱ्यावर जिवापाड मर्जी बसली. राजाराम महाराज गादीवर आले त्यावेळीं महाराष्ट्रावर "**न भूतो न भविष्याति**" असा घोर प्रसंग आला होता. तो हाच कीं, मराठ्यांमध्यें अंतस्थ कलह असलेले पाहून त्यांचें राज्य बुडविण्याच्या हेतूनें त्याचा जुना वैरी अलमगीर यानें केलेली प्रचंड स्वारी. परंतु अखेर बादशहाच्या ह्या स्वारीचा शेवट अत्यंत कष्टमय झाला. मराठे वीरांनीं बादशाही सैन्याला नको नकोसें करून सोडलें. इतकेंच नव्हे, तर बादशाही सैन्याच्या घोड्यांनांही मराठे पाण्यांत दिसूं लागले ! ! याच वेळीं दाभाड्याची खरी स्वामिभक्ति दिसून आली. मोगलांच्या हातून सुटण्याकरितां राजाराम महाराजांना आपलीं ठिकाणें वारंवार पालटावीं लागत.

मोंगलांनीं रायगड घेतल्यावर राजारामास त्याच्या सरदारांनीं चंदी-चंदावर ( जिंजी तंजावर ) येथें जाण्याजी मसलत दिली. या वेळीं महाराजांबरोबर प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, दाभाडे, धनाजी जाधव, खंडोबल्लाळ अशीं एकवीस माणसें होतीं. हा प्रसंग फार आणीबाणीचा होता. या मंडळीसोबत राजारामाच्या तीन बायका व इतर माणसें होतीं. त्यांत विशेष हें कीं, येसबा दाभाड्याचींही बायकामुलें त्यांच्यांत होतीं. तेव्हां एवढी ही मंडळी ह्या संकटांतून पार पडणें दुरापस्त झालें. अशा वेळीं राजनिष्ठ येसबा दाभाड्याचें इमान वर्णनीय दिसून आलें. त्या बहादुरानें राजस्त्रिया संभाळण्यास कठिण जाऊं नये ह्मणून, जोहार करणाऱ्या रजपूत वीरांप्रमाणें स्वतःच्या हातांनीं आपल्या बायकांची कत्तल केली ! येसबासारखी स्वामीभक्ति व राजनिष्ठता क्वचित्च आढळेल.

येसबाला खंडोजी व शिवबा असे दोन पुत्र होते; ते या वेळीं जवळ होते, पण ते बरेच मोठे असल्यामुळें त्यांस मारण्याचें येसबाला धैर्य होईना. अशा वेळीं त्याच्या पुत्रांनींही आपल्या स्वामिभक्तीची पराकाष्ठा केली. तेव्हां "शुद्धबीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं" असें कोण ह्मणणार नाहीं ? राजारामाच्या स्त्रियांनां ह्या वीरपुत्रांनीं आळीपाळीनें आपल्या पाठुंगळीस घेऊन मोठमोठ्या मजला नुसत्या पळतच केल्या. शिऊनें तर विशेष प्रसंगीं राजारामाला पाठीवर घेऊन एक दोन कोस नव्हे, अगदीं पंचवीस कोस एकसारखी पळत मजल मारिली. त्यामुळें तो छातींत फुटला; व त्या स्वामिनिष्ठ मुलाला रक्ताची गुळणी येऊन मृत्यु आला. हें वर्तमान ऐकून राजारामाला पराकाष्ठेचें दुःख झालें. येसबाचें दुःख काय वर्णावें ! त्याचें दुःख त्यालाच ठाऊक ! असो. याप्रमाणें राजारामाची सर्व मंडळी त्यांच्या स्वामीनिष्ट सेवकांच्या कर्तबगारीनें इच्छित ठिकाणास सुखरूप पोहोंचली. पुढें राजारामानें दाभाड्याचे उपकार फेडण्यासाठीं खंडोजीस सेनापती केला. त्यावेळीं येसाबा हयात नव्हता. आमची कथानायिका ही याच वीराची पत्नी होय. आणि येसबाची स्नुषा होय.

खंडेरावानें शाहू महाराजांच्या कारकिर्दींत गुजराथ व बागलाण येथें मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली. त्यानें मोंगलाशीं बऱ्याच घनघोर लढाया मारून जय मिळविले. खंडेराव दुसरीकडे लढायांत गुंतला असतां

एकदां शाहूनें सेनापतीच्या कामावर मानसिंग मोरे यांस नेमिलें होतें, परंतु तो नालायक ठरून अखेरीस तें पद खंडेरावासच मिळालें. पुढें खंडेराव दाभाडे वारल्यावर त्याचे पुत्र त्रिंबकराव दाभाडे यांस आणून नजराणा वगैरे करार करून सेनापती पदाचीं वस्त्रें बहुमान यथापद्धति दिलीं....खंडेराव दाभाडे यांची स्त्री उमाबाई दाभाडे ही फार शहाणी होती. तिचे अनुमतें सरकारी सुभा व सरदारी चालवावीसें करून दिलें ! यावरून उमाबाई दाभाडे यांची योग्यता केवढी होती हें आतां आपणच ठरवा.

यावेळीं पेशवे 'बाजीराव' हे होते. शाहू महाराजांचा व त्यांचा स्नेह फार असे. शाहू महाराजांची त्यांच्यावर फार मर्जी असे. या पेशव्यांचें व दाभाड्यांचें लवकरच एका कारणावरून वैर पडलें. तें कारण हेंच कीं, माळवाप्रांताच्या बाबतींत सरदेशमुखीचा मामला दाभाड्याकडे असतां बाजीरावानें त्या प्रांतावर स्वारी केली. हें दाभाड्यास अर्थात् खपलें नाहीं. तेव्हां त्यानें बाजीरावास "तुम्ही आमचे मुलुखांत येऊं नये" असें लिहून कळविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दुसरे बाजीरावाची रग जिरविण्याची निजामासही इच्छा होती; त्यानेंही दाभाड्यास मदत करण्याचें कळविलें. अखेरीस लढाईचा प्रसंग प्राप्त होऊन 'डभई' येथें उभय सैन्याची कडाक्याची लढाई झाली. ही लढाई तीन प्रहरपर्यंत जहाली. दोहींकडील नामी नामी माणसें रणांत बहुत पडलीं. सेनापतींनीं हत्तीवरून तिरंदाजी चालवून शत्रू सैन्याचा फन्ना चालविला होता. अहाहा ! त्यावेळीं वीरपुत्र त्रिंबकरावाचें बाण मारण्याचें हस्तकौशल्य पाहून

"कदा नेणों वोढी शरधिंतुनि काढी शर कदा ॥
कदा धन्वीं जोडी वरिवरिहि सोडी तरी कदा ॥
विपक्षाच्या वक्षास्तव विवरलक्षास्तव रणीं ॥
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधान करणी ॥

असे उद्गार निघाल्यावांचून राहिले नसतील. त्रिंबकराव आपल्या वीर-मंडळाला म्हणाला:—"वीरहो ! पेशव्यानें मराठ्यांच्या राज्याचा अधिकार आपणांकडे घेण्याची खटपट चालविली आहे. परंतु हें कृत्य खऱ्या मराठ्याला पाहवत नसल्यामुळें हा युद्धप्रसंग आला आहे, तरी पेशव्याला आज आपलें

क्षात्रतेज दाखऊन दिपवून टाका" असा शेवटपर्यंत उपदेश चालविला होता. परंतु दाभाड्यांच्या दुर्दैवानें त्यांचा हेतू पूर्ण झाला नाहीं. बाजीरावानें फितूरी करून दाभाड्यांच्या सैन्यांत फाटाफूट करविली होती; त्यामुळें अपजयाची बाजू दाभाड्याकडे आली. त्रिंबकरावासारखा रणशूर मोहरा बाजीरावाच्या कपटानें मारला गेला, हें कृत्य शूर म्हणविणाऱ्या बाजीरावाला कितीसें शोभेल ? असो.

वरील पराजयाची व पुत्रनिधनाची बातमी ऐकून बिचाऱ्या उमाबाईला अतोनात शोक झाला. माता व तिचा पुत्र यशवंतराव यांच्या अपरिमित शोकाचें सादृश्य ह्मणजे अभिमन्युवध प्रकरणांत श्रीधरकवीनें ह्मटल्याप्रमाणें

ओंव्या—" उपलव्य नगरीहुनी । उत्तरा, सुभद्रा धांऊनी । त्वरें आल्या बसोनि वहनीं । हृदय पीटिती अतिदुःखें ॥ ४९ ॥ सुभद्रेतें न धरवे धीर । शरीर टाकिलें पृथ्वीवर । माझा अभिमन्य सुकुमार । दावा एकदां पाहीन मी ॥ ५० ॥ हे अभिमन्या कमळलोचना । हे सौभद्रा, चंद्र-वदना । हे कोमलांगा मधुर भाषणा । ये धांवोनि मज भेटें ॥ ५१ ॥ हे घनश्यामवर्णा । हे अभिमन्या प्रति अर्जुना । हे महावीरा सुहास्यवदना । ये धांवोनि मज भेटें ॥ ५२ ॥ हे किशोरवया परम उदारा । समरधीरा प्रतापशूरा । पांडव कुलदीपका सुंदरा । केली त्वरा सर्वांआधीं ॥"

ह्याप्रमाणें अत्यंत करुणाजनक आणि श्रीयाळ चरित्रांतील चांगुणेनें दाखविलेल्याः—

" उदकावीण जैसा मीन । तैसी मी तान्हया तुजवीण । माझें हृदय निर्दय कठीण । लोकांत वदन केंवि दाखऊं ॥ ४२ ॥ तुझी माउली मी ह्मणतां । लाज वाटेरे गुणवंता । तुवां आपली सार्थकता । करूनि गेलासी शिवपदा ॥ ४३ ॥ हें त्रिभुवन शोधितां सकळ । तुजं ऐसा न दिसेल...'

कळवळयाच्या पुत्रवात्सल्य प्रेमाप्रमाणेंच होतें. असो. आपल्या आवडत्या पुत्राची बाजीरावानें अशी वाट लाविलेली पाहून उमाबाईला अत्यंत क्रोध चढला. येशवंतरावानींही या कृत्याचा पुरा सूड घेण्याचा निश्चय करून स्वारीची तयारी केली. व शूर उमा व तिचा वीरपुत्र हीं दोघींहीं डंवचलेल्या पंचननाप्रमाणें कपटी बाजीरावाच्या नरड्याचा घोंट घेण्याकरितां मोठ्या झपाट्यानें निघालीं. अहाहा ! त्यावेळचा त्यांचा तो निश्चय ह्मणजे दुःशासनाचा वध करणाऱ्या भीम महाराजांप्रमाणें होता.

आणि यदाकदाचित् शाहू महाराज मध्यें पडले नसते, तर बाजीरावावर काय प्रसंग ओढवला असता हें आमच्यानें सांगवत नाहीं.

शाहूमहाराजांना ही गोष्ट कळतांच " महाराजांनीं चित्तीं आणिलें जे-उभयता सरदार आपले. कलह होऊन अयुक्त गोष्ट जहाली. यांचें समाधान करावें. " ह्मणोन श्रीमहादेव येथें श्रीचे दर्शनास स्वारी जाऊन श्री जेजुरीस गेले. तेथून तळेगांवीं जाऊन उमाबाईचें समाधान बहुत रीतीनें करावें तसें करून त्रिंबकराव यांस पुत्र येशवंतराव दाभाडे होते त्यांस व उमाबाईस समागमें घेऊन सातार्‍यास बराबर आणिलें. आणि बाजीराव प्रधान यांसही बोलावणें पाठवून आणविलें. नंतर बाजीराव यांजला घेऊन महाराज बोलले—" त्र्यंबकराव तुझा पुत्र व बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे यांचा भाऊपणा होता. त्यास हा ( बाजीराव ) ही तुझाच पुत्र आहे. शाहूमहाराजांची आज्ञा उमाबाईस मोडवेना. तिनें उदार मनानें बाजीरावाला त्याच्या अपराधाची क्षमा केली. " " नंतर उभयतांनीं तह करून घेतला कीं याउपर कोणी किंतु न धरितां सरकारसेवा करावी....येशवंतराव यांस सेनापती पदाचीं वस्त्रें बहुमान यथापद्धति देऊन, गौरव करून निरोप दिला. " उमाबाईच्या वरील थोरपणाची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. असो.

पुढें थोडक्याच दिवसांनीं उमाबाईचें अचाट शौर्य दिसून आलें. शाहूमहाराजांनीं सेनापतीकडे अहमदाबादेचें ठाणें काबीज करण्याकरितां हुकूम पाठविला. सेनापती वयानें लहान होते, तरी त्यांचा तेजस्वीपणा राजांना ठाऊक असल्यामुळेंच त्यांनीं ही कामगिरी यांच्यावर सोंपविली. या अहमदाबादेस ठाणेदार जोरावरखांबाबी नामक होता. हुकूम पोंचतांच दाभाडे निघाले. सोबत उमाबाई व तिचा धाकटा पुत्रही होता. हीं दोन्हीं मुलें मोठीं तेजस्वी होतीं. वीरपत्नी उमाबाईची सत्कीर्ति अगोदर दशदिशा व्यापून राहिली होती. दाभाडे व उमाबाई आपणांवर चाल करून येत आहेत, हें ऐकूनच खानसाहेबांची तिरपिट उडाली. तेव्हां निदान धाक देऊन तरी आपला बचाव झाल्यास पहावें असें मनांत योजून, खानसाहेबांनीं खालील आशयाचें पत्र उमाबाईकडे धाडिलें. " तूं बोलूनचालून विधवा. तुझीं पोरें अगदीं लहान. अंगांत कुवत नाहीं. बर्‍या बोलानें फौज घेऊन निघून जा. नाहींतर ह्या शूराचा बच्चा जोरावरखां

आहे हें पक्कें लक्षांत ठेव" खानाचा विनाशकाल आला होता म्हणून त्याला ही बुद्धि सुचली. उमाबाईनें तो मजकूर वाचतांच तिच्या हृदयांत क्रोधाचा आनिवार संचार झाला. पिसाळलेल्या वाघिणीप्रमाणें तिनें आपले दांत कडकडां चावले. नंतर प्रतिज्ञा केली कीं–"या कृत्याचा जर मी पुरान् पुरा सूड न घेईन तर नांवाची उमाबाईच होणार नाहीं!" नंतर तिनें आपल्या लोकांसमक्ष आपल्या हातानें आपल्या समोर बांगड्या व कुंकू ठेऊन त्यांकडे बोट करून ती आपल्या सरदारास ह्मणाली "ह्या पत्रांत ठाणेदारानें माझा जो अपमान केला आहे, त्याबद्दल मी त्याचा जेव्हां पुरा सूड उगवीन-तेव्हांच अन्नग्रहण करीन, अशी प्रतिज्ञा केली आहे. आपण सर्व माझे सरदार, निमक खाल्लेले अहांत, त्याची तुह्मांस चाड असेल तर मृत्यूचीही पर्वा न करितां या उद्दाम वर्तनाच्या नोडग्याशीं सामना द्या. अथवा पहिले प्रसंगा सारखे (त्रिंबकरावांच्या वेळीं फितूरी केली त्याप्रमाणें) करणें असेल तर स्वतःच्या हातांत सर्वांसमक्ष या बांकड्या चढवा, आणि ललाटीं कुंकवाचें लेपन करून भागुबाई बनून घरीं परत जा." उमाबाईचें हें निर्वाणीचें भाषण ऐकून सर्वांनीं एकदिलानें लढण्याची शपथ घेतली. नंतर विद्युद्वेगानें ते खानावर चाल करून गेले.

इकडे खानही दहा हजार फौजेनिशीं रणभूमीवर येऊन ठाकला. युद्ध सुरू झालें. दाभाड्यांकडचे वीर खूब शौर्यानें लढले. जोरावरखां तर उमाबाईची ती कालिकामूर्ति पाहून पळून जाऊन, अहमदाबादच्या दुर्गांत शिरून दारें वगैरे बंद करून भागुबाईप्रमाणें लपून बसला. उमाबाई वीर गर्जना करीत त्याच्या मागें लागली. त्यावेळचा तिचा वीर, वेश फारच प्रेक्षणीय होता. तिचें तें शौर्यकृत्य पाहून शत्रूंनींही आश्चर्य केलें. नंतर उमाबाईनें किल्ल्याच्या दरवाजांना मोडून तोडून आग लावून दिली. व किल्ल्यांत शिरून खानाची चांगलीच रग जिरविली. अशाप्रकारें त्या शूर मराठा क्षत्रियस्त्रिनें आपली भीमप्रतिज्ञा शेवटास नेली.

जोरावरखांच्या सैन्याची दुर्दशा उडून तें दशदिशांला पळून गेलें. व अखेरीस वीरश्रीनें आपल्या वीर भगिनीस मोठ्या प्रेमानें विजयमाला अर्पण केली. दाभाडयांच्या सोमवंशाला शोभा आणणाऱ्या उमाबाईच्या शौर्यकीर्तिचें स्मरण झालें ह्मणजे असें वाटतें कीः—

" सुरतसे कीरत बडी । बिन पंख उडजाय ॥

सुरत तो जाती रही ॥ कीरत कबहू न जाय ॥

# ताराबाई.

( ५ )

मराठ्यांचें स्वराज्य स्थापन करणारे जे शिवाजीमहाराज त्यांच्या धाकट्या मुलाची—राजारामाची—ताराबाई ही ज्येष्ठ पत्नी, व हंबीरराव मोहिते यांची कन्या. हिचें जन्म सन १६७५ त झालें. मराठ्यांच्या इतिहासांतील राजकारस्थानी स्त्रियांत हिला प्रमुखत्व आहे. ताराबाई ही विलक्षण धाडसी व कर्तृत्ववान् स्त्री होती.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मरणानतर त्यांची बायको येसूबाई व पुत्र शाहू ह्यांना सूर्याजी पिसाळाच्या फितूरीमुळें, मोगलांनीं कैद करून नेलें, हें इतिहास प्रसिद्ध आहे. संभाजी महाराजांच्या मागून राजाराम गादी-वर आले. राजाराम महाराजांच्या वेळीं महाराष्ट्राची स्थिति फारच भयंकर झाली होती. संभाजीच्या मरणानें औरंगजेब बादशहा हा महाराष्ट्रावर—मराठ्यांचें राज्य बुडविण्याचे हेतूनें—प्रचंड सैन्य घेऊन आला होता. त्याच्या प्रचंड फौजेनें महाराष्ट्राचे बहुतेक भाग व्यापून टाकिले होते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं मराठे वीरांना स्वराज्यरक्षणाची मोठी स्फूर्ति चढली. व त्याप्रमाणें प्रल्हाद निराजी, धनाजी जाधव, इत्यादि क्षत्रियकुलतीलक मराठे वीरांनीं आपल्या असामान्य बाहुबलानें औरंगजेबाला त्राहि भगवन् करून सोडिलें. शिवाजी महाराजांनीं दिलेल्या सगळ्या जाचाचें उट्टें काढण्याच्या हेतूनें बादशहानें ही प्रचंड स्वारी केली होती, पण तीही अगदीं निष्फळ झाली; अखेरीस अशा अत्यंत अपमानजनक स्थितींतच अहंमदनगर मुक्कामीं बादशहाचा अंत झाला !

वरील स्वारीमुळें राजाराम महाराजांचा पाय एका स्थळीं असा कधींच ठरला नाहीं. स्वरक्षणार्थ त्यांना आपलीं ठिकाणें नेहमीं बदलावीं लागत होतीं. या स्वारींत एकदां राजारामानें शाहूस बादशहाच्या कबजांतून ओढून घेण्याचा प्रयत्न केला होता. इ. स. १६९८ त बादशहाच्या

छावणीवर खुद्द राजारामानें छापा घातला होता, तो याच कारणासाठीं. शाहूलाही आतां बादशहाच्याजवळ राहण्याचा कंटाळा आला होता. एकदां राजारामानें शाहूच्या सुटकेबद्दल बादशहाकडे मागणीसुद्धां घातली होती. तेंव्हां बादशहा थट्टेनें शाहूस म्हणाला, " मी तुम्हांला तुमचे काकांकडे पाठवितों, जातां काय ? " त्यावर शाहू म्हणाला, "आमचे काकांचा पूर्वीपासून स्वतः राज्य करण्याचा हेतु आहे. आमचे वडिलांस कैदेंत ठेऊन, स्वतः राज्य घेण्याचा त्यांनीं यत्न केला. रायगडावर आपलें धरणें आलें तेव्हां आम्हांस सोडून जिंजीकडे गेले, व आतां पुनरपि आम्हांस आपले ताब्यांत घेऊन कैदेंत मात्र ठेवतील, तर आपण त्यांचें पारिपत्य करून, आम्हांस राज्यावर बसवाल, तेव्हांच राज्य करूं. " शाहूनें फारच धोरणानें हें उत्तर दिलें होतें. पुढें लवकरच राजाराम महाराज मरण पावले, व सर्व अधिकार ताराबाई हिच्याकडे आला. राजारामाचा वडील मुलगा शिवाजी याचा जन्म १६९१ त झाला होता. तो यावेळीं फक्त १० वर्षांचा होता. त्यास तिनें गादीवर बसवून त्याचे नांवें कारभार चालविला.

याच वेळीं अशी गोष्ट घडून आली कीं, राजारामाचे वेळीं अमात्यपद जनार्दनपंत हणमंते यांजकडे दिलेलें होतें. पुढें जनार्दनपंत १६९७त मरण पावले. यावेळीं परशुराम त्रिंबक किनईकर यानें तें पद मिळविण्याची खटपट केली पण ती साधली नाहीं.राजारामानें तें पद रामचंद्रपंत यांस दिलें, तेव्हां अमात्यपदाबद्दल उभयतांमध्यें लढा पडून राहिला होता. राजारामाच्या मरणानंतर इ. स. १७०१ त ताराबाईनें परशुराम त्रिंबक यांस तें पद दिलें. मोगलांशीं युद्ध करण्यासाठीं रामचंद्रपंतानें ठिकठिकाणीं उत्तम बंदोबस्त केला, व ते राजाराम महाराजांच्या कुटुंबास भेटण्याकरितां पन्हाळ्यावर आले. तेव्हां ताराबाईनें शिवाजीची मुंज करून त्यास राज्याभिषेक करावा असा त्याला आग्रह केला. याचे पूर्वी साताऱ्याचा किल्ला बादशहानें काबीज केला असून रामचंद्रपंत पादशहास सामिल आहे असा ताराबाईला संशय आला होता. आणखी रामचंद्रपंतास प्रतिनिधि पदावरून दूर केल्यामुळें ताराबाई व परशुराम त्रिंबक ह्यांचें हें करणें त्यास आवडत नव्हतें. रामचंद्रपंतानें ताराबाईस सांगितलें:—

"शाहूची सुटका झाल्यावर दोघांच्या मुंजी एकदम कराव्या" पण परशुराम त्रिंबक व संकाजी नारायण सचिव यांचा ओढा ताराबाईकडे असल्यामुळें त्यांनीं ताराबाईचें बोलणें कबूल करावें म्हणून रामचंद्रपंतास आग्रह केला. रामचंद्रपंतानें प्रसंगाकडे दृष्टि देऊन कलह मिटविण्याकरितां माघार घेतली. नंतर सर्वानुमतें मुंजीचा निश्चय करून समारंभ आटोपल्यावर पन्हाळे मुक्कामीं राज्याभिषेक झाला. ( १७०१ ) बुंदकर घाटगे यांची कन्या भवानीबाई इच्याशीं शिवाजीचें लग्न करून दिलें. त्यावेळीं त्याचें वय १० वर्षांचें होतें. राजसबाई व तिचा पुत्र संभाजी यांस ताराबाईनें कैदेंत ठेविलें.

अशा गोष्टींमुळें मराठी राज्यांत सगळी अव्यवस्था माजून गेली. आपसांत कलहाचें बीजारोपण झालें. शिवाजी महाराजांच्या सुव्यवस्थेचा कित्ता आतां गिरवला न गेल्यामुळें अर्थात झोटिंग पातशाहीचीं चिन्हें दिसूं लागलीं. ताराबाईच्या महत्वतृष्णेमुळें व स्वार्थसाधुवृत्तीमुळें जुन्या पद्धतींवर बहुतेक विरजण पडत चाललें. राजाराम महाराज हयात होते तोंपर्यंत ताराबाईला त्यांच्या विरुद्ध—आपल्या मनासारखें—कांहीं एक करितां येणें शक्य नव्हतें. ते निवर्तल्यावर तिला दाही दिशा मोकळ्या झाल्या. ताराबाईला एका दृष्टीनें बरेंच महत्व देतां येईल. तिच्या अंगांत महत्वाकांक्षा, साहस, धैर्य व कारस्थानपटुता हे गुण होते. हे गुण अंगीं असणें बरें, पण तिनें स्वार्थाला जरा फांटा द्यायला पाहिजे होता व असें झालें असतें तर ताराबाईचें नांव बरेंच सुप्रसिद्ध असतें. ताराबाईनें जीं कारस्थानें रचलीं, ज्या मसलती केल्या किंवा डाव रचिले त्यांत स्वार्थापलीकडे कांहीं नव्हतें. तिची राज्यतृष्णा अनिवार होती; राज्यनाश व्हावा अशी तिची कधींहि इच्छा नव्हती. पण तें राज्य आपणांस मिळावें. आपल्या मुलाला मिळावें, येसूबाईच्या मुलाला—शाहूला—तें मिळूं नये अशी तिची फार मनापासून—इच्छा होती. शाहूला मुक्त करूं नये अशाबद्दलही तिनें खटपट चालविली होती, पण ती निष्फळ झाली. ही खटपट मोअज्जिमचा वजीर मोनिमखान याच्या द्वारें चालविली होती. शाहू सुटल्याची खबर तिनें जेव्हां ऐकिली, तेव्हां तिनें आपला पक्ष सबळ

होण्याचा यत्न चालू केला. निरनिराळ्या गडांवर फिरती राहून त्या ठिकाणांचा तिनें चांगला बंदोबस्त करून ठेविला.

औरंगजेबानंतर मोअज्जिम हा गादीवर बसला, तोंपर्यंत शाहू तेथेंच होता. शाहूमहाराजांचा मराठे सरदारांशीं अंतस्थ पत्रव्यवहारही चालू होता. राजारामाचें पश्चात् राजकारभाराचें सर्व काम रामचंद्रपंत पहात होते. शाहूनें ताराबाई व राजसबाई यांस प्रणाम व शिवाजी, संभाजीस आशीर्वाद कळवून, शिवाय पंतास लिहिलें कीं,—"काकांचे ठिकाणीं तुही आहां. काकासाहेबांनीं राज्यरक्षण केलें, तें आपण रक्षावें. श्रीकृपेनें सुदिन प्राप्त होईल." असो.

वर सांगितल्याप्रमाणें मोअज्जिम जेव्हां गादीवर बसला तेव्हां, औरंगजेबाचे इतर मुलगे भांडूं लागले. अखेरीस या मत्सरामींत अजीम व कामबक्ष यांचे बळी पडून मोअज्जिम हाच गादीवर बसला. यापूर्वींच शाहूची सुटका झाली होती. जेव्हां औरंगजेबाचा मुलगा अजीम हा मोअज्जिमशीं लढण्यास गुंतला होता; व तो आपल्या सैन्यासह नर्मदा उतरून माळव्यांत शिरला होता तेव्हां, शाहू त्याजबरोबरच होता. अजीमला तेथें खबर लागली कीं, ताराबाईनें महाराष्ट्रांतील बहुतेक किल्ले परत घेतले. अजीमचा वजीरपुत्र झुल्पिकारखान यानें बादशहास अशी सल्ला दिली कीं, "शाहूस आपल्या देशीं जाऊन स्वतःचें राज्य मिळविण्यासाठीं खटपट करण्याची परवानगी दिली असतां मराठे अगदींच स्वतंत्र न होतां, त्यांचा थोडाबहुत बंदोबस्तच होईल. ताराबाई व शाहू यांच्यांत लढाई उत्पन्न होईल, व त्यामुळें आपणांस मराठ्यांपासून त्रास पोंचणार नाहीं." अजीमशहानें शाहूस त्याच्या पन्नास माणसांसह दक्षिणेंत परत पाठविलें; अजीमशहानें त्या वेळीं शाहूशीं ठराव केला कीं, "तुम्हीं आपणांस दिल्लीचे बादशहाचे अंकित समजून राज्य करावें, तुमची आई व भाऊ ( दासीपुत्र मदनसिंग ) व बायका यांस आम्हांपाशीं ठेवावें. तुम्हीं जर आमच्याशीं नीट रीतीनें वागाल तर तुम्हांस गोदा व भीमा यांच्यामधील मुलुख आणि विजापुरकरांच्या मुलखांपैकीं कांहीं देऊं." या ठरावाप्रमाणें शाहूमहाराज मोठ्या त्वरेनें मोंगलांची छावणी सोडून बाहेर पडले. आतां गादीवर खरा हक्क कोणाचा होता हा एक प्रश्नच आहे.

ताराबाईनें तर शिवाजीची मुंज करून, त्याला सिंहासनारूढ करून घेतलें होतें. क्षत्रियत्वाशिवाय राज्याधिकार नाहीं, व मुंजीशिवाय क्षत्रियत्व नाहीं. अशा समजुतीप्रमाणें ताराबाईनें आपल्या मुलाचा हक्क तर राज्यावर स्थापन केला. शाहूमहाराज गोदावरी उतरून अलीकडे आले आणि ताराबाईसाहेब व त्यांचे पुत्र शिवाजी राजे, प्रधान व आमात्य रामचंद्रपंत वगैरे मुत्सद्दी सचिव चिटणीस यांस पत्रें पाठविलीं कीं, "आह्मीं बादशहा-पासून निघून मुक्कामास येऊन पावलों. लौकरच येतों."

हें वर्तमान ऐकून व पत्रें पाहून ताराबाईस वाईट वाटलें. तिनें लोकांस कळविलें कीं, "आपले पुत्रास राज्य देऊन, शिक्के करून आजपर्यंत चालविले. आपले भ्रतार यांनीं आजपर्यंत श्रम व साहस करून राज्य रक्षिलें, त्यास आपले पुत्र व आपण राज्य करावें. पूर्वीं एक वेळ तोतया शाहूराजा होऊन आला, त्यास मारिलें. तसेंच हेही ह्मणून फौजा पाठवून त्यांचें पारिपत्य करावें, धरावें व मारावें." ऐसा हेतु धरून सर्व सरदार व मुत्सद्दी प्रधान मिळवून विचार करती झाली. त्यांत रामचंद्रपंत आमात्य, व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि हे मुख्य होते. व संक्राजी नारायण सचिव, निळकंठ मोरेश्वर प्रधान, व तिमाजी रघुनाथ हणमंते, धनाजी जाधवराव सेनापति, व खंडो बल्लाळ चिटणीस इत्यादिकांस आपला मनोदय सांगितला. "तुह्मां सर्वांस इतराजी करून संभाजी राजे यांनीं सर्वांचीं पारिपत्यें निरपराधी केलीं. राज्य गमाविलें, दौलत, हत्ति, घोडे, पागा, खजीना सर्व गमाविलें. राजारामसाहेब यांनीं पुढें चंदीस जाऊन, तुह्मां-सर्वांस वाढवून श्रम करून राज्य सोडविलें. यास्तव त्यांचे पुत्र शिवाजी राजे यांस अंतर न देतां, फौज घेऊन खरे किंवा खोटे शाहू राजे असोत, त्यांशीं लढावें धरावें, अशी शपथ करून मसलत करावी." ह्मणून शपथा घेतल्या, हें वर्तमान शाहू महाराज यांसही समजलें तेव्हां, मराठी राज्यांतील दुफळी पाहून त्यांस अत्यंत दुःख झालें. इकडे ताराबाई एवढेंच करून राहिली नाहीं, तर तिनें रामचंद्रपंत व परशुरामपंत याज-कडून शपथक्रियाही केली. नंतर ताराबाईनें सुभे व किल्ले यांस पत्रें पाठविलीं. "किल्ले देऊं नयेत, कोणी जाऊन भेटूं नये, खर्चास मुलुखांतील वसूल देऊं नये." ताराबाईनें लढाईची व्यवस्थाही करून ठेविली.

शाहूमहाराजांनां आतां लढाईवांचून गत्यंतर दिसेना. त्यांच्याजवळ पंधरा हजार सैन्य जमलें होतें. गोदावरी उतरून 'शिवणें' परगण्यांतून येत असतां पारद येथें ताराबाईच्या सैन्याची व यांची लढाई झाली. तींत शाहूची फत्ते झाली. लढाईच्या वेळीं एका पाटलाच्या स्त्रीनें आपलें लहान मूल शाहूच्या पालखींत टाकिलें व म्हणाली, " यांस वांचवावें....हें मूल आपणांस वाहिलें आहे." लढाईंत फत्ते झाली म्हणून मुलाचें नांव फत्तेसिंग ठेविलें. व अक्कलकोट संस्थान त्यांचे नांवें करून दिलें.

पारदहून शाहूमहाराज खेड–कडूस येथें आले. तों इकडून ताराबाई-तर्फे प्रतिनिधि व सेनापति चाळीस हजार फौज घेऊन आडवे आले. धनाजीच्या मनांत शाहूशीं लढण्याचें नव्हतें. व ताराबाईनें चालविलेलें कृत्यही त्यांना पसंत नव्हतें. धनाजीला शाहूनें आपल्यांकडे वळवून घेतलें. धनाजीनें प्रतिनिधीस न समजू देतां फौजेंत फितूर केला, व कपटयुद्ध केलें. प्रतिनिधि व ताराबाईच्या लष्याचे सरदार बहुत लढले. पण पराभव होऊन पळून गेले. नंतर धनाजी, खंडो बल्लाळ, नारोराम रंगराव, वगैरे मंडळी शाहूस मिळाली. प्रतिनिधीनें पळ काढून साताऱ्याचा किल्ला गांठिला व तेथून सर्व वर्तमान ताराबाईस कळविलें.

शाहूनें १७०७त सातारचा किल्ला घेतला. तेव्हां प्रतिनिधि परशुराम त्र्यंबक यांस कैदेंत टाकिलें व त्याच्या जागेवर गदाधर प्रल्हाद यास नेमिलें. धनाजीस सेनापति, व बहिरोपंत पिंगळे यांस मुख्य प्रधान केलें. याचवेळीं बहादुरशहानें झुल्पिकारखान यास दक्षिणेंत कामबक्ष याजवर पाठविलें होतें, त्याला पूर्वस्नेह स्मरून शाहूनें मदत केली. त्यावरून त्यानें बहादुर-शहास शाहूला दक्षिणेची सरदेशमुखीची सनद देण्यास सिद्ध केलें.

ताराबाईला हें कळतांच तिनें खानखानान् याच्या मार्फत आपले वकील बादशहाकडे पाठविले व सरदेशमुखीचे हक्क आपल्या मुलाच्या नांवें मागितले, पण बादशहा पक्का वस्ताद होता. त्यानें ठरविलें कीं, "शाहू व ताराबाई यांनीं आपसांत लढून खरा पक्ष कोणता हें ठरवावें, म्हणजे त्यास फर्मानें देण्यांत येतील." असो.

इकडील मंडळीची शाहूविषयीं चांगली बुद्धि होती, तथापि ताराबाई जबरदस्त कारस्थानी ! शाहूचा स्वभाव तितका निग्रही व कपटी नव्हता.

तरी सुद्धां शाहू आपल्या प्रयत्नापासून कधींही ढळला नाहीं. कारण, " नैराश्य उचित नव्हे, स्पष्ट करावें धरोनि हांव, रण " असा त्याचा बाणा होता, व अखेरपर्यंत त्याचें उत्तम परिपालनही शाहूनें केलें.

पावसाळ्याच्या दिवसांत शाहूनें धनाजीस ताराबाईच्या ताब्यांतील किल्ले घेण्यास आज्ञा केली. प्रथम त्यानें पन्हाळा घेतला, पुढें शाहूनें १७०९ चा पावसाळा साताऱ्यास काढून तो कोल्हापुराकडे गेला. धनाजी जाधव कोल्हापुराहून परत येतांना वारणेच्या तीरीं १७१० त मरण पावला. याच्या मरणानें शाहूची बरीच हानि झाली. इकडे ताराबाईच्या मंडळीचीं कारस्थानें सुरू होतीच. ताराबाईच्या मंडळींनीं निरनिराळे टापू व्यापिले होते. सुप्याकडे दमाजी थोरात, भोराकडे सचिव, फलटणकडे शहाजी निंबाळकर, मिरजेकडे उदाजी चव्हाण, दक्षिण कोंकणांत खेम सांवत, उत्तर कोंकणांत कान्होजी आंगरे ह्याप्रमाणें ताराबाईच्या पक्षाचे लोक फांकलेले होते.. शाहूचा सेनानायक धनाजी याच्या मृत्यूनें ताराबाईचा पक्ष फारच सबळ झाला होता. परंतु इतक्यांत ताराबाईवर दुर्दैव ओढवलें. शिवाजी हा काळपुळीच्या रोगानें १७१२त मरण पावला. तेव्हां ताराबाईच्या आशा जागच्या जागीं विरमल्या ! सर्व कारस्थानें फसल्यासारखीं झालीं, सत्ता गेली, मान गेला, उत्साह गेला. नैराश्यानें ताराबाईला पुरें घेरलें. ताराबाईची ही स्थिति ह्मणजे एका संस्कृत कवीनें दैवाच्या प्रतिकूलतेविषयीं आपलें मत प्रकट केलें आहे त्याप्रमाणेंच झाली. श्लोक येणेप्रमाणें:—

विधौ विरुद्धे न पयः पयोनिधौ । सुधौघसिंधौ न सुधा सुधाकरे ॥
न वांच्छितं सिध्यति कल्पपादपे । न हेम हेमप्रभवे गिरावपि ॥"

दैव प्रतिकूल झालें असतां जलनिधींतही जल सांपडावयाचें नाहीं, अमृतौघाचा सिंधु जो चंद्र त्याच्या ठायीं सुधेचा बिंदूही मिळावयाचा नाहीं, प्रत्यक्ष कल्पवृक्षाकडे गेलें तरी इष्टसिद्धि व्हावयाची नाहीं आणि सुवर्णप्रभव जो मेरू ह्याच्या ठायीं सोनें सांपडणें नाहीं! ताराबाईचें दुर्दैव ह्याच प्रकारचें होतें.

शिवाजी मरण पावतांच रामचंद्रपंतानें ताराबाईस कारभारांतून काढून, ती व तिची सून या उभयतांस अटकेंत ठेविलें. व राजसबाईचा पुत्र

संभाजी यास गादीवर बसवून दक्षतेनें कारभार चालविला. मागें सांगि-तल्याप्रमाणें शाहूच्या सुदैवानें बाळाजी विश्वनाथानें दिल्लीच्या बादशहा-पासून चौथाई मिळविली. शाहूची उत्तरोत्तर भरभराट होत गेलेली पाहून ताराबाईस वाईट वाटूं लागलें तेव्हां, अंतस्थ कलहाचा फैलाव फार झाला. बाळाजीविषयीं ताराबाईचें मन पक्कें बिघडलें तें कायमचेंच !

मागें सांगितलें आहे कीं, शाहूनें पन्हाळा हस्तगत केला, त्या वेळीं ताराबाई रांगण्याकडे वळली. शाहूनें रांगण्यावरही चाल केली तेव्हां ताराबाई रांगणा सोडून, खालीं कोंकणांत मालवण येथें निघून गेली. मालवणास असतांनाच रामचंद्रपंत वगैरे मंडळीच्या साह्यानें १७१० त ताराबाईनें कोल्हापुरास कायमची गादी स्थापिली होती. धनाजी जाधव मेल्यानंतर त्याचा मुलगा चंद्रसेन जाधव हा ताराबाईच्या पक्षाला मिळूं इच्छित होता. त्यानें तशा अर्थाचें एक पत्रही ताराबाईला लिहिलें होतें. त्यांत हैबतराव निंबाळकर, दमाजीथोरात, खंडेराव दाभाडे, संताजी पांढरे इत्यादि मंडळी आपल्या कटांत सामील करून घेतली. शत्रूंचा विशेष बंदोबस्त झाला पाहिजे इत्यादि मजकूर होता. त्या वेळीं ताराबाईनें चंद्र-सेन जाधवास पुढील प्रमाणें जबाब लिहिला होता. "आपण लिहिलेलें वर्त-मान श्रवणें गोचरेंकरून संतोषातिशय झाला. तो पत्रारूढ किती काय म्हणून करावा? कार्यकर्तव्य, पराक्रमी, मायेचे हिंदु सेवक असावे ते तुह्मां-सारखेच कृतकर्मे असावे. रा. धनाजी जाधव कै. रा. स्वामींचे (राजारा-माचे) वेळेपासून राज्याभिवृद्धीविषयीं केलेले श्रम, साहस व सांप्रत दुहीमुळें राज्याभिवृद्धीस झालेला अपाय चित्तांत आणून, पुढें स्वामींचें राज्यवृद्धीतें पाववून, यशकीर्ति संपादावी, हें मनीं धरून, जो अर्थ विशदें लिहिला, तो उचित व यथार्थित लिहिला तरी, तुह्मी दीर्घदृष्टेच आहां. हें राज्य ताम्राक्रांत झालें असतां कै० स्वामींनीं लहानापासून थोरास आपली माया लावून, अवधियांवर सदयत्वें कृपामृत वृष्टि करून दिनप्रतिदिनीं राज्य वृद्धिंगत पावविलें. ते प्रसंगीं कै० स्वामींचे संपूर्ण कृपेस पात्र एक जाधवराव मात्र झाले ते आपल्या कर्तृत्वावरी व हुकूम-बारदारी एकनिष्ठेवरी झाले. राज्याभिवृद्धिविषयीं त्यांनीं कांहीं सामान्य कसाला श्रम, साहस केला नाहीं, जीविताची तमा न धरितां,

स्वामीकार्यींचे तत्पर राहिले.........राज्याभिवृद्धीचा उपाय मायेच्या सेवकाविना दुसऱ्याचे मनांत कसा येईल ? तरी दुही निःशेष करून स्वामींचें शासन चालविण्याचा संकल्प सफल करावा, प्रतिनिधि, दाभाडे, व मोरे यांस एकाग्रतेनें जवळ आणावयाचा विचार कल्पून, आपलें कर्तेपण प्रकट केलें ही गोष्ट कांहीं साहाजिक केली नाहीं. ही तुमची दीर्घदृष्टि व आंगेजणीव बुद्धीचें वैभव व शूरत्वाचा प्रसंग मनन करून पाहतां दुसरीं साम्यता आहे असें नाहीं.... हैबतराव निंबाळकर सरलष्कर यांची चित्तवृत्ति स्वामींचे चरणीं सुदृढ आहे...त्याचप्रमाणें शेरात खंडेराव दाभाडे व संताजी पांढरे यांनीं तुमच्या चित्ताच्या ठायीं एकरूप होऊन महत्कार्य संपादिलें येणेंकरून स्वामी त्यांजवर संतुष्ट आहेत.....रा. मानसिंग मोरे, शहाजी निंबाळकर आदिकरून कुलसरदारांस समाधानपत्रें पाठविलीं आहेत....अवघ्यांच्या विचारें स्वामीकार्याची सिद्धि करावी अशीच स्वामींनीं अवधियांस आज्ञापत्रीं आज्ञा केली आहे. सर्व गोष्टींनीं मातोश्रीसाहेब व स्वामी बहुत संतोषी आहेत..." वरील पत्रावरून ताराबाईच्या कारस्थानाची चांगली साक्ष पटतें. पुढें लवकरच चंद्रसेन जाधव व शाहू यांचा तंटा विकोपास गेला. जाधवाची खोड मोडण्याकरितां शाहूनें हैबतराव निंबाळकरास पाठविलें. चंद्रसेन जाधव हा पांडवगडावर होता. तेथें गांठ पडून लढाई झाली, तींत जाधवाचा मोड होऊन तो पळून जाऊन ताराबाईच्या पक्षास उघड मिळाला. पुढें चंद्रसेनानें व ताराबाईनें शाहूच्या सैन्यांत फितवा मांडला. त्याप्रमाणें हैबतराव निंबाळकर हाही ताराबाईस येऊन मिळाला. फक्त एकटा बाळाजी मात्र शाहूकडेच राहिला होता. त्यानें शाहूस अखेरपर्यंत सोडलें नाहीं. बाळाजीलाही फितविण्याचा यत्न जाधवानें केला पण फुकट गेला.

१७१२ त शिवाजी वारला, तेव्हां त्याची बायको भवानीबाई गरोदर होती, ती प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव राजाराम ठेविलें. (शके १६३४,) त्याचा घात करावा अशी बुद्धि राजसबाईला होऊन तिचा तसा प्रयत्न दिसून आला. नंतर मूल वारलें असें लटकें करून त्या मुलाला भगवंतराव रामचंद्र आमात्य यांचे वाड्यांत कांहीं दिवस ठेविलें. ताराबाईचा अगदींच निरुपाय झाला होता. तिच्या हातचा डाव राजस-

बाईनें उचलिला तो कायमचाच उचलिला. तेव्हांपासून संभाजी व शाहू यांच्यांत कलह उपस्थित झाला. चंद्रसेन जाधवादिकांचीं कारस्थानें खूब जोरानें सुरू होतींच. त्यानें आपल्यामार्फत निजामास संभाजीचा दोस्त करून ठेविलें. याच सुमारास संक्राजी नारायण हा मरण पावला. हा सचिव ताराबाईशीं इमानानें वागला. ह्याला शाहूनें आपल्याकडे ओढण्याचा यत्न केला होता, पण तो ताराबाईशीं शपथक्रिया करून चुकला होता. १७१२त जेव्हां शाहूनें याच्या मुलखावर चाल केली तेव्हां, शाहूशीं लढण्याचें सामर्थ्य त्याला होईना. त्यानें अंबवडें येथील नागनाथ तीर्थांत जलसमाध घेतली ! त्याच्या मृत्यूनें संभाजीचा पक्ष लंगडा पडला. नंतर शाहूनें दमाजी थोरात, कृष्णराव खटावकर व कुलाब्याचे आंग्रे हे जे शाहूच्या विरुद्ध संभाजीच्या वतीनें झगडत होते, त्यांची खोड मोडण्याचा निश्चय केला. प्रथम खटावकरांशीं शाहूनें लढाई दिली तेव्हां,तो दातीं तृण धरून शाहूस शरण आला, तेव्हां शाहूनें त्यास खटाव गांव इनाम करून दिला. दमाजी थोराताच्या बंदोबस्ताकरितां शाहूनें बाळाजीस पाठविलें. बाळाजीनें थोरातास कैद करून, शाहूच्या आज्ञेनें सातान्यास कैदेंत ठेविलें. पुढें आंग्र्याच्या समाचारास शाहूनें बाळाजीसच पाठविलें. त्यानें आंग्र्याची समजूत करून शाहूच्या पक्षास ओढलें. ताराबाईचा पक्ष आतां मात्र अगदींच लंगडा पडला. ती अगदीं निरुत्साह झाली. संभाजीच्या पदरीं फक्त रामचंद्रपंत या नांवाचा एक इसम राहिला होता. पण तोही पहिल्या रामचंद्रपंताप्रमाणें हुशार नव्हता. चंद्रसेनास तर आतां कांहीं सुचेना. चंद्रसेन स्वभावानें अभिमानी, हट्टी, एकदां स्वीकारलेली पद्धत कधींही न सोडणारा असा होता. परंतु आतां त्याला आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां मोंगलांचा आश्रय करावा लागला.शाहूनें अशा शूर पुरुषास समजुतीनें आपल्याकडे घेतलें नाहीं हें फार वाईट झालें. चंद्रसेनाप्रमाणें हैबतराव निंबाळकर व त्याचा पुत्र रावरंभा हे ही मोंगलांस मिळाले. मोंगलांचा सरदार चेंयाकुलीचखान हा सर्जेराव घाटग्याच्या मध्यस्थीनें संभाजीस हरएक मदत करून शाहूच्या मुलखांत उपद्रव करी, मराठ्यांची योग्यता कमी व्हावी एतदर्थ निजाम तर रात्रंदिवस युक्ति योजित होता. हैद्राबादेची चौथाई मराठे घेत तिचा निम्मे हिस्सा आपल्यास मिळावा

असें संभाजीराजानें मागणें घातलें. व नबावानें तर शाहूचा सरदेशमुखीचा ऐवज वसूल करणाऱ्या कारकुनास हांकून लाविलें. तेव्हां अर्थात्च तंटा विकोपास जाऊन लढाईचा प्रसंग प्राप्त झाला. संभाजी राजे तोफखाना, जंगी सामान, गारदी वगैरे मातबर तयारी करून जाधवराव वगैरे सरदार, मनसबदार वगैरे घेऊन लढाईस तयार झाले.

शाहूकडून बाजीराव पेशवा त्यांच्यावर चाल करून गेला. लढाई झाली तींत संभाजीच्या पक्षाचा मोड झाला, व कांहीं अटीवर बाजीरावानें निजामापासून तह करून घेतला. लढाई संपून संभाजी राजे पन्हाळ्यास परत आले. त्या वेळीं अपजयामुळें त्यांस फार वाईट वाटलें.

त्या काळीं उदाजी चव्हाण हा एक अथणी प्रांतांत मोठा पुंड होता. शिखळच्या ठाण्यांत राहून तो चौथाई या नांवाची पट्टी घेऊन, पुंडपणा करी. हा संभाजी राजाचा अश्रित म्हणवी, पण तसा कांहीं वागत नसे. शाहूनें त्याच्या बंदोबस्ताकरितां श्रीपतराव प्रतिनिधि यांस तिकडे पाठविलें. प्रतिनिधि चालून येतांच संभाजीराजेही चव्हाणास मिळाले. तेव्हां ज़ी लढाई झाली तींत चव्हाण व राजे यांचा मोड होऊन ते उभयतां पळून गेले. प्रतिनिधीनें कबिले व बुणगे लुटिलेले डेरे होते, त्यांत ताराबाई व राजसबाई व संभाजी महाराजाचे सर्व कबिले सांपडले. संभाजी महाराजांचा मोड होऊन ते पन्हाळ्यावर आले व त्यांनीं तेव्हांपासून (शके १६५० त.) शाहूच्या विरुद्ध न जाण्याचा निश्चय केला, त्याच सालीं उभयतांचा समेटही झाला. यानंतर सर्व मंडळीची व शाहूची भेट करून दिली. शाहूमहाराजांनीं मोकळ्या मनानें सर्वांची भेट घेतली व आदरसत्कार केला व ह्मटलें–“ आपली जावयाची मर्जी असल्यास जावें. ” तेव्हां ताराबाई ह्मणाल्या–“ कोठेंही कैदेंत राहावयाचें, त्यास ते व तुह्मी मला सारखेच आहां. तुह्मांपाशींच राहतें. ” त्यावरून लवाजमा व खर्च नेमून देऊन सातारा किल्यावरील वाडा नीट करून ताराबाईस दिला. ताराबाई मरेपर्यंत तेथेंच होती. ती पुढें ८६ वर्षांची होऊन १७६१ त पानपतची लढाई झाल्यावर पौष महिन्यांत निवर्तली. मरतेवेळीं तिनें म्हटलें, “ नाना व भाऊ हे दोघे मेले हें ऐकून मरतें. हें बरें झालें.” ताराबाईचें चरित्र येथेंच समाप्त झालें.

---

# भीमाबाई होळकरीण.

( ६ )

हिंदुस्थानाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासामध्यें ज्या राजकारणी, सद्गुणी, विदुषी, चतुर, साहसी, शूर, स्वाभिमानी, तेजस्वी आणि धार्मिक अशा स्त्रिया होऊन गेल्या, त्यांची संख्या पुष्कळ आहे. परंतु त्यांच्या चरित्रांच्या अभावामुळें त्यांचें यश अगदीं अप्रसिद्ध व संकुचित राहिलें आहे.

"चक्षुर्वै सत्यं" या ह्मणण्याप्रमाणें साधारण जनतेचा कल असल्यामुळें प्रत्यक्ष दिसेल तेंच खरें मानण्याचा प्रघात सर्वत्र प्रचलित आहे. आणि महाराष्ट्राच्या दुर्दैवानें महाराष्ट्रांतील कित्येक विख्यात स्त्रियांचीं चरित्रें केवळ नामनिर्देशानें दृग्गोचर होत असल्यामुळें त्या स्त्रिया विख्यात होऊनही त्यांचा सगळा खरा इतिहास अनुपलब्ध असल्याकारणानें— त्यांना या राष्ट्रांत महत्व नाहीं. आणखी "आमच्या देशांत "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः" अशा प्रकारची पूर्वी स्त्रियांविषयीं सन्मानबुद्धि असून, स्त्रियाही आपल्या उत्तम गुणांनीं ह्या सन्मानास पूर्णपणें पात्र होत्या. परंतु त्यांचीं उज्वल चरित्रें किंवा गुणमहिमा आमच्या नेत्रांसमोर नसल्यामुळें त्यांचे सद्गुण, त्यांची बुद्धिमत्ता आणि त्यांची कर्तृत्वशक्ति ह्याविषयीं आमच्या मनांत यत्किंचित्ही प्रकाश पडत नाहीं. त्यामुळें त्यांच्याविषयीं "न स्त्री स्वातंत्र्य मर्हति" असला अनुदारपणा, आमच्या मनांत येत आहे व त्यामुळें आमच्या राष्ट्राचें व समाजाचें अपरिमित नुकसान होत आहे."

आमच्या देशाच्या इतिहासांत जितक्या ह्मणून स्त्रियांचीं नांवें आढळतात, तितक्या सर्वांचा इतिहास जर आज उपलब्ध असता तर "चक्षुर्वै सत्यं" या न्यायाप्रमाणें स्त्रियांविषयींची अनादरबुद्धि आमच्या मनांत कधींहि येतीना. परंतु आमचें महत् दुर्दैव कीं, ज्या देशांत आह्मीं

जन्मलों, वाढलों, वागलों, त्या देशाचा खरा इतिहास, त्या देशाची खरी माहिती, आह्मांस उपलब्ध नाहीं ! असो.

" जर सर्व स्त्रियांचीं चरित्रें उपलब्ध होतील तर आपल्या राष्ट्रांतील स्त्रियांचे उत्तम गुण व त्यांची योग्यता अधिक प्रकाशित होऊन भावी पिढीस त्याचा फार फायदा होईल."

महाराष्ट्राच्या इतिहासांत कित्येक स्त्रिया अशा होऊन गेल्या कीं, " त्यांच्या योगानें महाराष्ट्रस्त्रियांच्या आंगीं राज्यभार वाहण्याची मोठी धमक होती व त्या मर्दुमकीच्या कामांतही तरबेज होत्या असें स्पष्ट दिसतें. मराठ्यांच्या स्त्रिया ह्मणजे गोषांतील बंदिवान अशी जी प्रचलित समजूत आहे ती सर्वथा चुकीची आहे. मराठ्यांच्या स्त्रिया शौर्यपराक्रमाच्या गुणांत परिपूर्ण असून घोड्यावर बसणें, भाला फेंकणें, वगैरे शौर्यविद्या त्यांना फारच चांगल्या अवगत होत्या. आणि म्हणूनच ग्रांट डफ, कर्नल क्लोज, व मि. एल्फिन्स्टनसाहेब आणि सर जॉन मालमक ह्यांच्यासारख्यांनींहि मराठ्यांच्या स्त्रियांची फार महति गाइली आहे. भीमाबाई होळकरीण या शूर स्त्रीचे चरित्र असेंच असल्यामुळें त्याची माहिती अल्पांशानें मी वाचकांस सांगत आहे."

" होळकर घराण्यांतील मूळ पुरुष मल्हारराव होळकर हे तर इतिहासज्ञांस अवगत आहेतच. हे फार शूर होऊन गेले. हे इ. स. १७६५ त आपल्या ७६ व्या वर्षी मरण पावले. यांना खंडेराव नामक पुत्र होता. परंतु तोही आपल्या बापाच्या आधींच निवर्तला होता. म्हणून मल्हाररावांच्या मागें खंडेरावांची बायको अहिल्याबाई व तिचा पुत्र मालेराव हीं राज्याचीं मालक झालीं. परंतु पुढें मालेराव लवकरच वारला, व सर्व कारभार अहिल्याबाई पाहूं लागली. तिनें आपल्या मुलखाचा कारभार एवढ्या दक्षतेनें चालविला होता कीं, तिची प्रजा तिला शुद्ध आईप्रमाणें मानूं लागली. न्याय, नीति, सदाचरण व शहाणपण ह्यांची ती साक्षात् मूर्तिच होती. नंतर तो सर्व कारभार अहिल्याबाईचा मानीव पुत्र तुकोजीराव याजकडे गेला. तुकोजीराव होळकरही फार शूर होता तो १७९७ त मरण पावला. त्याला चार मुलगे होते. त्यांपैकीं यशवंतराव होळकर हाच पुढें ज्यास्त प्रसिद्धीस आला. आमच्या चरित्रनायिकेचा

हा पिता होय. तुकोजीराव मेल्यावर गादीसंबंधें तंटे उत्पन्न होऊन अखेरीस यशवंतरावच गादीवर बसला. यशवंतरावानें शिंदे, पेशवे व इंग्रज यांबरोबर अनेक लढाया मारल्या. १८०४ त त्यानें चंबळा नदीजवळ इंग्रज सरदार कर्नल मॉनसन् याजबरोबर लढाई करून त्याचा इतका पराजय करून टाकला कीं, "कर्नल मॉन्सन हा घोड्यावर हौदा आणि हत्तीवर खोगीर ठेवून पळत सुटला" सारांश एवढी त्याची धांदल उडविली! परंतु यशवंतरावांच्या प्रतापार्काला लवकरच मदिरारूप राहूनें ग्रासून टाकिल्यामुळें तो अगदींच निस्तेज झाला. व त्याच अवस्थेंत त्यांचा अंत अत्यंत कष्टमय झाला. यशवंराव होळकर मनाचे धीट व शरिराचे सुदृढ होते. त्यांचें आंगीं प्रसंगावधान फार होतें व हा गुण त्यांच्या कन्येच्या आंगीं तंतोतत उतरला होता. शौर्यकृत्यांत तर ती अगदीं आपल्या पित्याप्रमाणेंच होती. यशवंतरावांनां मराठी व फारशी भाषा येत होत्या. त्यांची कन्याही मोठी वक्तृत्ववान् होती.

यशवंतरावाच्या मागून त्यांची दासी तुळशीबाई ही कारभार पाहूं लागली. तिनें मल्हारराव नांवाचा मुलगा दत्तक घेतला होता. ही उत्तम गाणारी, सुस्वरूप आणि मोठी चित्तमोहक असल्यामुळें तिजपुढें कोणाचें चालेना. तिनें यशवंतरावाच्या बाळरामशेट नामक प्रामाणिक दिवाणास काढून ठार मारविलें. यामुळें राज्यांत अव्यवस्था होऊन अखेरीस १८७७ त तिला मारेकऱ्यांनीं क्षिप्रा नदींत लोटून देऊन ठार मारिलें. ही घोड्यावर बसणारी उत्तम होती. ती स्वार होऊन बाहेर पडे तेव्हां, मोठमोठ्या मानकऱ्यांच्या बायका आपणाबरोबर घोड्यावर बसवून घेई. तेव्हां त्यांची शोभा अत्यंत वर्णनीय दिसे. असो.

यावेळीं भीमाबाई कुठें होती व काय करीत होती हें कळण्यास मार्ग नाहीं; पण १८१७ च्या महिदपुरच्या लढाईच्या थोड्या आधीं एकवेळ मालकमची व तिची मुलाखत झाली होती. त्यावेळीं तिनें होळकराच्या घराण्याचा व राज्याचा नाश होण्याचा प्रसंग आला असतांना मोठ्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें राजकन्येच्या कर्तव्याचें सुरेख वर्णन केलें आणि असें सांगितलें कीं, "आमच्यासारख्या निपुत्रिक व विगतपति अबलांनीं अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या थोर घराण्याचा लौकिक व राज्य हीं रक्षण करण्याकरितां रणामध्यें सैन्याचें आधिपत्यही स्वीकारिलें पाहिजे."

"भीमाबाई घोड्यावर फार डौलदार रीतीनें बसत असे. आणि तिची भाला फेंकण्याची चतुराई इतर लोकांस क्वचित्‌च साधत असे." खानदानीच्या घराण्यांतील मराठे स्त्रिया बहुधा रेखल्याप्रमाणें सुंदर नसतात; परंतु त्यांचा चेहरा गंभीर असून, त्यांच्या मुद्रेवर तेजस्विता आणि हुषारी चांगली प्रकट दिसते. बहुतकरून सर्व मराठे स्त्रियांनीं, ज्या ज्या वेळीं प्रसंग आला, त्या त्या वेळीं, आपली कार्यक्षमता व धैर्यशीलता व्यक्त केली आहे. जिजाबाई, अहिल्याबाई, ताराबाई, बायजाबाई इत्यादि सुप्रसिद्ध स्त्रियांच्या चरित्रांत वरील सर्व गोष्टी दिसून येतात. या स्त्रियांत भीमाबाईचीही गणना होईल. इ. स. १८१७त महिदपूरची लढाई आटोपली व होळकरांच्या सैन्याचा पूर्ण पराजय झाला तेव्हां अर्थात्‌च भीमाबाईसारख्या वीरस्त्रीला तो अपमान सहन झाला नाहीं. तिनें लगेच थोडेसें सैन्य तयार करून सर्व देश उध्वस्त करण्याचा क्रम चालविला, तो पुष्कळ दिवस चालू होता. एके दिवशीं सर जॉन मालकम् हा मोठ्या सैन्यानिशीं चाल करून जात असतां त्याला भीमाबाई थोड्या अंतरावरून जात असतांना दिसली. त्या वेळीं तिच्याबरोबर एकच शिपाई होता. तेव्हां मालकमनें तिला डुबाडण्याकरितां तिच्या भोंवतीं थोड्या अंतरावर गराडा देण्याचा हुकूम केला. त्याबरोबर तिचा शिपाई गराडा पडण्यापूर्वींच निसटून गेला. परंतु भीमाबाईनें पळण्याचा प्रयत्न मुळींच केला नाहीं, तेव्हां आतां ही आपल्या हातीं खचित लागणार असें मालकमच्या सैन्यास वाटलें. इतक्यांत तिनें मालकमाच्या जवळील सैन्यास हुलकावणी दाखवून आपल्या घोडीला वेग देऊन ती सुरक्षितपणें निसटून गेली." यावरून भीमाबाईचें धैर्य व्यक्त होतें. इतिहासांत भीमाबाईची हकीकत याच ठिकाणीं संपते.

समाप्त.

५०५

REFBK-0000595